घड्याळ म्हंटल की..
**विठ्ठल वॉच**


नामवंत कंपन्यांची घड्याळे
मिळतील विक्री व दुरूस्ती
सुधाकर कॉम्प्लेक्स,नगरपलिकेसमोर
मायणी रोड,विटा (जि.सांगली)
८२६२८३५३९१-९४२१२२१६३०



# प्रीतिसंगम

www.pritisangam.com
सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

वर्ष ३० वे | अंक ४६ | पाने ६ | किंमत २ रूपये | मंगळवार १६ जून २०२६ | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 | पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

संपादकीय — पान २ वर..
तृणमूलमचे विलीनीकरण
कृष्णाकाठ — पान २ वर..
नाद एकच, बैलगाडा शर्यत!

### ना.शंभूराज देसाई:नगरपालिका व जिल्हा परिषद निवडणूकीवेळी तुम्ही प्रतिसाद दिला का?..

# आलेल्या परिस्थितीला भाजपाला सामोरे जावे लागणार

**सातारा/प्रतिनिधीः–**



सातारा-सांगली विधान परिषदेची निवडणूक होत असून पालकमंत्री म्हणून यापूर्वी पार पडलेल्या नगरपालिका व जिल्हापरिषदेच्या निवडणूकीमध्ये मी समन्वय साधण्यासाठी भाजपाच्या दोन्ही मंत्र्यांना संपर्क केला, मात्र त्यांनी प्रतिसाद दिला नाही. ज्या दिवशी समन्वय समितीची बैठक बोलवण्यात आली त्याच दिवशी भाजपाने स्वबळाचा नारा दिला. आता विधान परिषदेसाठी होत असलेल्या निवडणूकीत आलेल्या परिस्थितीला ज्याचे त्याने सामोरे जावे विजयासाठी लागणारे संख्याबळ गाठणे ही त्यांची जबाबदारी आहे. त्यासाठी ते प्रयत्न करतील. आम्ही आमच्या पक्षाच्या सर्व मतदारांना एकत्रित बोलवणार असून त्यांचे म्हणने ऐकल्यानंतर जो काय निर्णय असेल तो वरिष्ठांना कळवू, अंतिम निर्णय आमचे नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे घेतील. असे स्पष्ट मत जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी व्यक्त केले.

सातारा-सांगली विधान परिषदेच्या पार्श्वभूमीवर मंत्री शंभूराज देसाई यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दोन दिवसांपूर्वी भेट घेतल्याची माहिती समोर आली होती. भाजप नेत्यांकडून शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना विश्वासात घेतलं जात नाही, अशी खंत शंभूराज देसाई यांनी व्यक्त केली होती. तसेच महायुतीच्या नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या नेत्यांची अनुपस्थिती होती, असं देखील वृत्त समोर आले होतं. त्यामुळे सांगली-सातारा विधान परिषद निवडणुकीत महायुतीचा उमेदवार जिंकणार की नाही? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

दरम्यान, सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भाजप विरुद्ध शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात संघर्ष बघायला मिळाला. यावेळी पोलीस बळाचा वापर करुन झालेल्या धक्काबुक्कीत मंत्री शंभूराज देसाई यांच्या हाताला इजा झाली होती. तसेच मंत्री मकरंद पाटील यांनाही या धक्काबुक्कीत धक्का लागला होता. या घटनेचा वचपा शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे स्थानिक नेते विधान परिषदेच्या निवडणुकीतून काढणार का? अशी देखील चर्चा आहे. या सर्व घडामोडींदरम्यान वरिष्ठ पातळीवर हालचाली घडल्याची माहिती मिळत आहे. वरिष्ठ पातळीवरुन सूचना मिळाल्या असल्या तरी स्थानिक पातळीवर काय-काय घडामोडी घडतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

कराडमध्ये झालेल्या महायुतीच्या समन्वय बैठकीला मंत्री शंभूराज देसाई उपस्थित नव्हते. याबाबत बोलताना ते म्हणाले मी जिल्हा परिषद, नगरपालिकेवेळी मी समन्वय साधण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी तुम्ही काय प्रतिसाद दिला. भाजपच्या दोन्हीही मंत्र्यांनी त्याला प्रतिसाद दिला नाही. समन्वय समितीच्या बैठकी दिवशीच स्व.बळावर लढणार असल्याचे जाहिर केले. तुमचा जर असा प्रतिसाद असेल तर आम्हालाही विचार करावा लागणार ना... असे सांगत आपली खदखद पुन्हा एकदा स्पष्ट करत, आलेल्या परिस्थितीला भाजपाला सामोरे जावे लागणार असे सांगितले.

### वरिष्ठ नेत्यांची बैठक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सातारा-सांगलीच्या जागेवरुन सुरु असलेल्या मतभेदांच्या पार्श्वभूमीवर बैठक घेतली. या बैठकीनंतर स्थानिक नेत्यांना एकत्रित काम करण्याच्या सूचना महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांनी दिल्या आहेत, अशी माहिती समोर येत आहे. यासोबतच मुख्यमंत्र्यांकडून कुठेच क्रॉस व्होटींग होणार नाही याबाबतचे निर्देश देण्यात आल्याची माहिती आहे.




कराड येथील शिवतीर्थावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास मनोज जरांगे-पाटील यांनी अभिवादन केले. यावेळी त्यांचे स्वागत करताना माजी नगराध्यक्ष जयवंत पाटील व रणजित पाटील, यावेळी नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष पोपटराव साळुंखे यांच्यासह नगरसेवक व मान्यवर. छाया-अस्लम मुल्ला.

# भाजपची 'व्हीप' रणनीती

## समर्थक मतदारांना निवडणुकीपर्यंत ठेवणार एकत्र

**सातारा/प्रतिनिधीः–**

सातारा-सांगली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीची रंगत वाढत असताना प्रमुख राजकीय पक्षांकडून मतदारांच्या संरक्षणासाठी आणि पक्षनिष्ठा कायम राखण्यासाठी विविध रणनीती आखल्या जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून भाजपने आपल्या समर्थक स्थानिक स्वराज्य संस्थांतील सदस्यांना निवडणुकीपर्यंत एकत्र ठेवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे.



सातारा जिल्ह्यातील शेंद्रे परिसरात रविवारी भाजपच्या पदाधिकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांतील सदस्यांची बैठक पार पडली. या बैठकीत निवडणुकीतील गणिते, मतदानाची तयारी आणि पक्षाची भूमिका यावर चर्चा करण्यात आल्याचे समजते. बैठकीनंतर काही सदस्यांना पुढील काही दिवसांसाठी एका नियोजित ठिकाणी हलविण्यात आल्याची माहिती राजकीय वर्तुळात चर्चेत आहे.

राज्यातील विधान परिषद निवडणुकांमध्ये क्रॉस व्होटिंग आणि मतफुटीच्या शक्यता लक्षात घेऊन विविध पक्षांकडून अशा प्रकारच्या उपाययोजना केल्या जातात. यंदाही निवडणुकीतील प्रत्येक मताचे महत्त्व वाढल्याने सर्वच पक्षांनी आपल्या मतदारांशी सातत्याने संपर्क ठेवण्यावर भर दिला आहे.

सातारा आणि सांगली जिल्ह्यांतील राजकीय समीकरणे अद्याप पूर्णपणे स्पष्ट नसल्याने या मतदारसंघातील निवडणुकीकडे राज्यभराचे लक्ष लागले आहे. महायुतीतील काही स्थानिक पातळीवरील मतभेद, तसेच मित्रपक्षांच्या कार्यकर्त्यांमधील नाराजी याबाबतही विविध स्तरांवर चर्चा सुरू आहे. त्यामुळे मतदानाच्या दिवशी कोणते राजकीय चित्र समोर येते, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

भाजपकडून या हालचालीबाबत अधिकृत माहिती देण्यात आलेली नसली तरी निवडणुकीपर्यंत पक्षाच्या मतदारांमध्ये समन्वय आणि एकजूट कायम ठेवण्यावर भर दिला जात असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. दरम्यान, १८ जून रोजी होणाऱ्या मतदानापूर्वी सर्वच पक्षांकडून राजकीय हालचालींना आणखी वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पश्चिम महाराष्ट्रातील ४२ लाख मराठ्यांना आरक्षणाचा लाभ

### मनोज जरांगे-पाटील;कराड दौऱ्यात मराठा समाजाच्या प्रश्नांवर भाष्य

**कराड/प्रतिनिधीः–**

कोल्हापूर व सातारा संस्थानच्या गॅझेटच्या अंमलबजावणीसंदर्भात महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी सोमवारी सविस्तर चर्चा झाली असून, या गॅझेटबाबतचा अहवाल तयार करण्यासाठी आयुक्तांकडून आवश्यक कागदपत्रे मागविण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होणार असल्याची माहिती मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिली.

तसेच या गॅझेटची अंमलबजावणी झाल्यानंतर पश्चिम महाराष्ट्रातील सुमारे ४२ लाख मराठा समाजबांधवांना आरक्षणाचा लाभ मिळेल आणि या भागातील मराठा समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक उन्नतीला मोठी चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मराठा आरक्षणाच्या जनजागृतीसाठी सुरू असलेल्या राज्यव्यापी दौऱ्यादरम्यान मनोज जरांगे-पाटील यांनी सोमवारी कराडला अल्पकाळ भेट दिली. यावेळी त्यांनी दत्त चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

कराड शहरात आगमन होताच मराठा समाजाच्या वतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. दत्त चौक परिसर घोषणांनी दुमदुमून गेला होता. यावेळी नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष पोपटराव साळुंखे, नगरसेवक जयवंतराव पाटील, रणजीतनाना पाटील यांच्यासह मराठा समाजातील युवक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना जरांगे-पाटील म्हणाले, मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी सुरू असलेला लढा निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. कोल्हापूर आणि सातारा संस्थानांशी संबंधित ऐतिहासिक गॅझेटची अंमलबजावणी ही पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाजासाठी महत्त्वाची ठरणार आहे. शासन स्तरावर या विषयाकडे गांभीर्याने पाहिले जात असून, आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लाखो मराठा बांधवांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळू शकतो.

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभर सुरू असलेल्या आंदोलनाला समाजाचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले. समाजातील तरुणांच्या शैक्षणिक व रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी आरक्षण हा महत्त्वाचा घटक असून, त्यासाठीचा संघर्ष अखेरपर्यंत सुरू राहणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

### श्रेष्ठ तम..

दाना मध्ये श्रेष्ठ तम
रक्त दान पुण्य कर्म
जीवदुजा वाचवावा
सांगतो प्रत्येक धर्म
न कळत ईश सेवा
का करावे कांडकर्म
सहजचं घडू शकते
रे निष्काम सेवापरम
खरे नाते मानवतेचे
सार्थक होतो जनम
वेळ येई आपल्यावर
कळेल तेव्हाचं मर्म
रक्त देता लागे वाढू
बाळगू नकात शरम
आरंभ करू आपण
मागुन ये गर्दी परम
रक्त दाताअशक्त हो
असमज असे वहम
रक्त निर्मिती वाढते
झटकून टाक संभ्रम
रक्तफॅक्टरी शरीरात
जाणा भाव सोहम्
रक्तदान रे महाश्रेष्ठ
ईश्वर अल्लाह रहम
रक्त मागणी पुरवठा
समिकरण हे विषम
रक्तदान नियमीत रे
अधिक बनवे सक्षम

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# वेण्णा तलाव पात्रात विषारी पाण्याची डबकी

### महाबळेश्वर-पाचगणीकरांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**महाबळेश्वर/संजय चोरगे:–**

महाबळेश्वर येथील वेण्णा तलावातील गाळ काढण्याच्या कामावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, कोट्यवधी रुपये खर्च करूनही मागील दोन वर्षांपासून सुरू असलेले काम अयोग्य पद्धतीने झाल्याचा आरोप होत आहे. तलावातून काढलेला गाळ इतरत्र न हलवता नदीपात्रातच साठवून ठेवण्यात आल्याने संपूर्ण कामाच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, गाळ काढण्यात आलेल्या ठिकाणी मोठमोठे खड्डे तयार झाले असून त्यामध्ये हिरव्या गडद रंगाचे पाणी साचले आहे. या डबक्यांमध्ये साप, बेडके आणि इतर जलचरांचा मुक्त संचार दिसून येत असल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे हे पाणी



दूषित किंवा आरोग्यास अपायकारक ठरण्याची भीती व्यक्त केली जात असून, भविष्यात याच जलस्रोतावर अवलंबून असलेल्या महाबळेश्वर व पाचगणीतील नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त होत आहे.

गाळ काढण्यामागील मूळ उद्देश तलावाची पाणी साठवण क्षमता वाढवणे हा होता. मात्र, काढलेला गाळ पुन्हा तलाव परिसरातच राहिल्याने तो पावसाळ्यात पुन्हा तलावात मिसळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सार्वजनिक निधीतून करण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांच्या खर्चाचा अपेक्षित लाभ होणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, यासंदर्भात वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून प्रभावी उपाययोजना करण्यात आलेली नाही. परिणामी, संभाव्य आरोग्यविषयक धोका, पर्यावरणीय परिणाम आणि सार्वजनिक निधीच्या वापराबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

स्थानिक पातळीवर अशीही मागणी होत आहे की, या संपूर्ण कामाची स्वतंत्र तांत्रिक चौकशी करून गाळ काढण्याची प्रक्रिया, खर्च, कामाची गुणवत्ता आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी यांची सखोल तपासणी करण्यात यावी. तसेच तलाव परिसरातील साचलेल्या पाण्याचे वैज्ञानिक परीक्षण करून त्याचा अहवाल सार्वजनिक करावा, अशी मागणीही जोर धरत आहे.

### अधिकारी पितात मिनरल वॉटर आणि सर्वसामान्यांच्या नशिबी विषारी पाणी?

वेण्णा तलावातील गाळ काढण्याच्या कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा संशय आहे. अधिकारी स्वतः मिनरल वॉटर पितात, मात्र सर्वसामान्यांच्या नशिबी दूषित पाणी येणार असेल तर ते अत्यंत दुर्दैवी आहे. या प्रकरणातील भ्रष्ट अधिकाऱ्यांची खातेनिहाय चौकशी झाल्याशिवाय मी शांत बसणार नाही.

**– सामाजिक कार्यकर्ते अभिजीत (सनी) ननावरे**

# शाळेची घंटा वाजली, ज्ञानमंदिरे फुलली

## विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने परिसर दुमदुमला;कराडसह परिसरातील शाळांत प्रवेशोत्सवाचा जल्लोष

**कराड/प्रतिनिधीः–**

तब्बल दीड महिन्यांच्या उन्हाळी सुट्टीनंतर सोमवारी शाळांची घंटा पुन्हा एकदा निनादली आणि कराड शहरासह परिसरातील सर्वच शाळांमध्ये नव्या शैक्षणिक वर्षाचा उत्साहपूर्ण प्रारंभ झाला. विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने, आनंदी चेहऱ्यांनी आणि स्वागताच्या विविध उपक्रमांनी ज्ञानमंदिरे पुन्हा एकदा गजबजून गेली. अनेक शाळांमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण, पुष्पवर्षाव, चॉकलेट वाटप आणि विशेष स्वागत सोहळ्यांद्वारे उत्साहात स्वागत करण्यात आले.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी शाळांमध्ये 'प्रवेशोत्सवा'चे वातावरण पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळांनी आकर्षक सजावट केली होती. प्रवेशद्वारांपासून वर्गखोल्यांपर्यंत रंगीबेरंगी फुगे, फुलांची आरास आणि सुबक रांगोळ्यांनी परिसर सजविण्यात आला होता. अनेक शाळांच्या फलकांवर विद्यार्थ्यांचे स्वागत करणारे संदेश झळकत होते. तसेच विद्यार्थी व पालकांना छायाचित्रे काढता यावीत यासाठी आकर्षक 'सेल्फी पॉइंट' उभारण्यात आले होते.







(सर्व छाया : अस्लम मुल्ला)

लहान मुलांची शाळेची भीती दूर व्हावी आणि त्यांना आनंदी वातावरण मिळावे यासाठी काही शाळांनी विद्यार्थ्यांच्या आवडीच्या कार्टून पात्रांच्या वेशभूषेतील कलाकारांना निमंत्रित केले होते. त्यामुळे शाळेत येणाऱ्या चिमुकल्यांमध्ये विशेष उत्सुकता आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना गुलाबपुष्प, चॉकलेट तसेच शुभेच्छा देण्यात आल्या.

पहिल्याच दिवशी अनेक विद्यार्थ्यांना नवीन पुस्तके, वह्या, गणवेश आणि शालेय साहित्य मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहताना दिसत होता. उन्हाळी सुट्टीत विखुरलेले मित्रमैत्रिणी पुन्हा भेटल्याने विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला होता. वर्गखोल्यांमध्ये गप्पा, हशा आणि नव्या वर्षाच्या योजनांची चर्चा रंगली होती.

दुसरीकडे, पहिल्यांदाच शाळेच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवणाऱ्या काही चिमुकल्यांना आई-वडिलांपासून दूर राहण्याची भीती वाटत असल्याने त्यांचे रडणेही पाहायला मिळाले. मात्र शिक्षक आणि पालकांनी त्यांची समजूत काढत त्यांना शाळेच्या वातावरणात रमविण्याचा प्रयत्न केला. मुलांना शाळेत सोडण्यासाठी आलेल्या पालकांची सकाळी शाळांच्या परिसरात मोठी गर्दी झाली होती.

कराड शहरातील नगरपालिका शाळा क्रमांक ३, यशवंत हायस्कूल, कन्या शाळा, नूतन मराठी शाळा, टिळक हायस्कूल, महाराष्ट्र हायस्कूल तसेच नगरपालिकेच्या इतर शाळा, जिल्हा परिषद शाळा आणि परिसरातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे विविध उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात स्वागत करण्यात आले. काही ठिकाणी ढोल-ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले, तर काही शाळांनी सांस्कृतिक कार्यक्रम, स्वागतगीते आणि प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन केले होते.

उन्हाळी सुट्टीनंतर पुन्हा सुरू झालेल्या शाळांमुळे कराड शहरातील शैक्षणिक वातावरणाला नवसंजीवनी मिळाली आहे. विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण उपस्थितीमुळे शाळा परिसर पुन्हा एकदा जिवंत झाला असून नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंद, उत्साह आणि नव्या आशांनी झाल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळाले.

# संपादकीय

## तृणमूलमचे विलीनीकरण

पश्चिम बंगालच्या राजकारणात गेल्या दीड दशकापासून एकहाती वर्चस्व राखणाऱ्या ममता बॅनर्जी आणि त्यांच्या तृणमूल काँग्रेससमोर आजपर्यंतचे सर्वात मोठे राजकीय आव्हान उभे ठाकले आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर पक्षातील नाराजी उफाळून आली आणि आता ती थेट पक्षफुटीच्या स्वरूपात समोर आली आहे. तृणमूल काँग्रेसच्या तब्बल २० खासदारांनी बंड करत नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया (एनसीपीआय) या अपरिचित पक्षात विलीनीकरणाची घोषणा केली आहे. या घडामोडीने केवळ बंगालचे राजकारणच नव्हे तर देशातील पक्षांतरबंदी कायदा, संसदीय लोकशाही आणि प्रादेशिक पक्षांचे भवितव्य या प्रश्नांनाही नव्याने चर्चेच्या केंद्रस्थानी आणले आहे.

विशेष म्हणजे, ज्या पक्षात हे खासदार विलीन झाले आहेत, त्या एनसीपीआय पक्षाची देशाच्या राजकारणात फारशी ओळख नव्हती. त्रिपुरामध्ये किरकोळ अस्तित्व असलेल्या आणि एकही आमदार किंवा खासदार नसलेल्या या पक्षाचे नाव अचानक राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आले आहे. त्यामुळे प्रश्न केवळ तृणमूलमधील बंडाचा नाही, तर या बंडामागील राजकीय गणिताचा आहे. ममता बॅनर्जी यांनी २०११ मध्ये ३५ वर्षांची डाव्या आघाडीची सत्ता उलथवून पश्चिम बंगालमध्ये परिवर्तन घडवले होते. त्यानंतर तृणमूल काँग्रेस हा बंगालच्या राजकारणाची मध्यवर्ती शक्ती बनला. परंतु कोणत्याही पक्षाचे दीर्घकाळ सत्तेत राहणे हे त्याच्या अंतर्गत विरोधाभासांनाही जन्म देत असते. तृणमूलबाबत तेच घडले आहे. या बंडामागे निवडणुकीतील पराभव नाही, तर नेतृत्वाच्या शैलीबद्दलचा असंतोष, अभिषेक बॅनर्जी यांचा वाढता प्रभाव आणि पक्षातील जुन्या नेत्यांचे कथित दुय्यमीकरण हे महत्त्वाचे घटक मानले जात आहेत. काकोली घोष दस्तीदार आणि सुदीप बंडोपाध्याय यांसारख्या नेत्यांनी नेतृत्वावर नाराजी व्यक्त केली. ही नाराजी आता संघटनात्मक संघर्षाच्या पलीकडे जाऊन अस्तित्वाच्या लढाईत परिवर्तित झाली आहे. या संपूर्ण प्रकरणातील विशेष म्हणजे, एनसीपीआयची निवड होय. एखादा राष्ट्रीय पक्ष न निवडता बंडखोर खासदारांनी एका अपरिचित पक्षात विलीन होण्याचा निर्णय का घेतला ? याचे उत्तर राजकीयपेक्षा अधिक कायदेशीर आहे.

भारतीय संविधानाच्या दहाव्या अनुसूचीतील पक्षांतरबंदी कायद्यानुसार, जर एखाद्या पक्षाच्या दोन-तृतीयांश सदस्यांनी दुसऱ्या पक्षात विलीनीकरण केले, तर त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई होत नाही. बंडखोर खासदारांचा दावा आहे की, त्यांच्यासोबत २८ पैकी २० खासदार आहेत आणि त्यामुळे ते दोन-तृतीयांश संख्येचा निकष पूर्ण होतो. एनसीपीआयमध्ये विलीनीकरण करून त्यांनी स्वतःला अपात्रतेपासून वाचवण्याचा मार्ग शोधला आहे. हा मुद्दा इतका सोपा नाही. तृणमूलचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांनी लोकसभा अध्यक्षांना लिहिलेल्या पत्रात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा आधार घेत स्पष्ट केले की, विधिमंडळ पक्षातील सदस्यांचे विलीनीकरण पुरेसे नाही. मूळ राजकीय पक्षाचेही विलीनीकरण झाले पाहिजे. म्हणजेच राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष या दोन स्वतंत्र संस्था आहेत. त्यामुळे केवळ खासदारांची संख्या दाखवून पक्षावर हक्क सांगता येणार नाही. याच वेळी महाराष्ट्रातील शिवसेना प्रकरणाची आठवण होते. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मोठी फूट पडली. त्यानंतर निवडणूक आयोग, सर्वोच्च न्यायालय आणि विधानसभा अध्यक्ष यांच्या विविध निर्णयांनी भारतीय राजकारणात नवा घटनात्मक वाद निर्माण केला. आता बंगालमध्येही जवळपास त्याच प्रकारची पुनरावृत्ती निर्माण होत आहे. तृणमूलचे बंडखोर खासदार पुढील टप्प्यात मूळ तृणमूल काँग्रेसवर दावा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांचा दावा असा आहे की, लोकप्रतिनिधींच्या दोन-तृतीयांश बहुमतामुळे त्यांच्याकडे पक्षाचे प्रतिनिधित्व आहे. परंतु निवडणूक आयोग आणि न्यायालये हा दावा कितपत मान्य करतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

या संपूर्ण घडामोडीत बंडखोर खासदारांनी लोकसभा अध्यक्षांची भेट घेण्यापूर्वी केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांची भेट घेतल्यामुळे अनेक तर्कवितर्क सुरू झाले आहेत. तृणमूलचे नेत्यांना हा प्रकार भाजपच्या राजकीय रणनीतीचा भाग असल्याचे वाटत आहे. त्यांच्या मते, बंगालमध्ये थेट सत्तांतर घडवून आणणे कठीण असल्याने विरोधी पक्षात फूट पाडण्याचे राजकारण भाजपाकडुन केले जात आहे. अर्थात, भाजपने हे आरोप फेटाळले आहेत. पण गेल्या काही वर्षांत महाराष्ट्र, मध्य प्रदेश, कर्नाटक, अरुणाचल प्रदेश आणि इतर राज्यांतील राजकीय उलथापालथी पाहता अशा शंका पूर्णपणे निराधार नाहीत. विशेषतः २०१६ मध्ये अरुणाचल प्रदेशात काँग्रेसच्या बहुसंख्य आमदारांनी प्रथम पीपल्स पार्टी ऑफ अरुणाचलमध्ये प्रवेश केला आणि नंतर भाजपमध्ये विलीन झाले होते. बंगालमध्ये घडणाऱ्या घटनांशी त्याची तुलना होत आहे. मात्र, या सगळ्या राजकीय गणितांमध्ये, मतदारांचा विश्वास दुर्लक्षित होत आहे. लोकशाहीमध्ये मतदार पक्षाच्या विचारसरणीवर, नेतृत्वावर आणि जाहीरनाम्यावर विश्वास ठेवून मतदान करतात. तृणमूलच्या तिकिटावर आणि ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली निवडून आलेले खासदार जर अचानक दुसऱ्या राजकीय पक्षात गेले, तर तो मतदारांच्या विश्वासाचा अनादर ठरतो. याच मुद्द्यावर कीर्ती आझाद, सागरिका घोष आणि इतर तृणमूल नेत्यांनी बंडखोरांवर टीका केली. निवडणुकीत भाजपविरोधी भूमिका घेऊन मते मागायची आणि नंतर सत्तेच्या समीकरणांसाठी त्याच पक्षाशी जवळीक साधायची, हा राजकीय नैतिकतेचा प्रश्न आहे. भारतीय राजकारणात पक्षांतराची परंपरा नवीन नाही; पण त्याचे वाढते प्रमाण लोकशाहीच्या गुणवत्तेबद्दल चिंता निर्माण करते.

बंगालमधील या फूटीमुळे, दीर्घकाळ सत्ता टिकवताना संघटनात्मक एकात्मता कशी राखायची ? पक्षातील नाराजी वेळेवर कशी ओळखायची ? उत्तराधिकार्याचा प्रश्न कसा हाताळायचा ? या सर्व बाबतीत तृणमूलला आत्मपरीक्षण करावे लागेल. एकेकाळी काँग्रेसच्या वर्चस्वाला आव्हान देणारी तृणमूल आज अंतर्गत संघर्षांनी ग्रासली आहे. सत्ताविरोधी लाटेवर उभा राहिलेला पक्ष स्वतः सत्तेच्या केंद्रीकरणाचा बळी ठरला आहे. आता या प्रकरणातील निर्णायक भूमिका लोकसभा अध्यक्ष, निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालय यांची असेल. दोन-तृतीयांश बहुमताचा निकष कितपत लागू होतो ? राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष यांच्यातील नाते कसे समजायचे ? या प्रश्नांची उत्तरे तृणमूलच्या भवितव्याचा निर्णय करणार नाहीत, तर भारतीय संसदीय लोकशाहीसाठीही महत्त्वाचा न्यायनिवाडा ठरतील. बंगालमधील हा संघर्ष म्हणजे, भारतीय लोकशाहीतील राजकीय निष्ठा, वैचारिक बांधिलकी आणि घटनात्मक मर्यादांची कसोटी आहे. ममता बॅनर्जी राजकीय साम्राज्य वाचवू शकतील की नाही, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. पण मतदारांनी दिलेल्या कौलाचा सन्मान राजकीय पक्ष आणि लोकप्रतिनिधी कितपत करतात, हा प्रश्न आहे. कारण लोकशाही विश्वासावर टिकून असते. आणि जेव्हा विश्वासच डळमळीत होतो, तेव्हा कोणत्याही पक्षासाठी धोक्याची घंटा वाजते.

# नाद एकच, बैलगाडा शर्यत !



**महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनात बैलगाडा शर्यत हा शेतकरी संस्कृती, पशुधन संवर्धन आणि परंपरेचा अभिमान आहे. गावोगावी होणाऱ्या यात्रा-जत्रा, सण-उत्सव आणि धार्मिक कार्यक्रमांमध्ये बैलगाडा शर्यतींना विशेष स्थान आहे. शेतकऱ्याच्या दावणीला बांधलेला बैल हा त्याच्या कुटुंबाचा सदस्य मानला जातो. त्यामुळे बैलगाडा शर्यती म्हणजे केवळ वेगाची स्पर्धा नसून शेतकरी आणि त्याच्या बैलांमधील जिव्हाळ्याच्या नात्याचा उत्सव आहे.**



**अशोक सुतार**

**कृष्णाकाठ...**

महाराष्ट्रात बैलगाडा शर्यतींची परंपरा सुमारे चारशे वर्षांहून अधिक जुनी मानली जाते. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर, नाशिक, रायगड तसेच विदर्भ आणि मराठवाड्यात विविध स्वरूपांत या शर्यती आयोजित केल्या जातात. प्रत्येक प्रदेशाने आपल्या भौगोलिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यानुसार शर्यतींचे वेगळे प्रकार विकसित केले आहेत. पुणे-अहमदनगर परिसरातील पारंपरिक बैलगाडा शर्यती, पश्चिम महाराष्ट्रातील छकडी शर्यती, विदर्भातील शंकरपट, कोल्हापूरचा चिखल गुट्टा, कोकणातील किनारा शर्यत आणि सांगली-कोल्हापूर भागातील आरत-परत शर्यती या त्यातील काही प्रमुख प्रकार आहेत. या सर्व स्पर्धांचे केंद्रस्थान असते ते खिलार बैल. महाराष्ट्रातील खिलार जात ही देशातील सर्वात रुबाबदार, ताकदवान आणि सहनशील जातींपैकी एक मानली जाते. बैलगाडा शर्यतींमुळे या जातीच्या संवर्धनाला मोठी चालना मिळाली आहे. एकेकाळी प्रत्येक शेतकऱ्याच्या घरात खिलार गाई-बैल आढळत असत. मात्र शेतीत यांत्रिकीकरण वाढल्याने आणि ट्रॅक्टरच्या वापरामुळे बैलांचे महत्त्व कमी होऊ लागले. अशा परिस्थितीत बैलगाडा शर्यतींनी खिलार जातीच्या अस्तित्वाला आधार दिला.

२०११ मध्ये केंद्र सरकारने प्राणी छळ प्रतिबंधक कायद्यांतर्गत बैलांचा समावेश संरक्षित प्राण्यांच्या यादीत केल्यानंतर बैलगाडा शर्यतींवर निर्बंध आले. त्यानंतर २०१४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने देशभरात बैलांच्या शर्यतींवर बंदी घातली. या निर्णयामुळे ग्रामीण भागात मोठी नाराजी निर्माण झाली. अनेक शेतकऱ्यांनी शर्यतीसाठी सांभाळलेले बैल विकले. खिलार जातीची पैदास घटू लागली आणि देशी गोवंशाच्या संवर्धनावर संकट निर्माण झाले. शेतकरी संघटना, बैलगाडा शर्यत प्रेमी आणि लोकप्रतिनिधींनी या प्रश्नासाठी सातत्याने लढा दिला. महाराष्ट्रात तसेच तामिळनाडू आणि कर्नाटकमध्ये शर्यतींना परवानगी देण्यासाठी कायदे करण्यात आले. प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेनंतर काही अटींसह बैलगाडा शर्यतींना पुन्हा परवानगी मिळाली आणि ग्रामीण भागात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

शर्यती पुन्हा सुरू झाल्यानंतर खिलार बैलांच्या मागणीत मोठी वाढ झाली. शेतकऱ्यांनी पुन्हा बैल संगोपनाकडे लक्ष दिले. आज अनेक बैलजोड्या लाखो रुपयांना विकल्या जातात. त्यांच्या आहार, आरोग्य आणि प्रशिक्षणावर मोठा खर्च केला जातो. बदाम, काजू, तूप, दूध आणि विशेष खाद्यपदार्थांचा समावेश असलेला पौष्टिक आहार या बैलांना दिला जातो. त्यामुळे बैलगाडा शर्यती केवळ परंपरेचे जतन करत नाहीत, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळ देतात. शर्यतींच्या माध्यमातून हजारो लोकांना रोजगार मिळतो. बैलगाड्या तयार करणारे कारागीर, पशुवैद्यकीय सेवा, वाहतूक व्यवसाय, खाद्यपदार्थ विक्रेते आणि विविध पूरक उद्योग या सर्वांना या स्पर्धांमुळे आर्थिक आधार मिळतो. गावांच्या यात्रा-जत्रांमध्ये होणारी आर्थिक उलाढाल लाखो रुपयांपर्यंत पोहोचते. त्यामुळे बैलगाडा शर्यती हे ग्रामीण अर्थकारणाचेही महत्त्वाचे केंद्र बनले आहेत.

याच परंपरेचा भव्य आविष्कार नुकताच कडेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या सोनहिरा केसरी पर्व-४ मध्ये पाहायला मिळाला. हजारो बैलगाडा शौकिनांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या स्पर्धेने संपूर्ण परिसर उत्साहाने भारावून गेला. अंतिम फेरीत सतीश हनमंतराव बर्गे यांच्या भवानी आणि नगरसेवक संतोष शेठ तोडकर यांच्या मल्हार या बैलांनी प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्यांचा सन्मान आमदार डॉ. विश्वजित कदम यांच्या हस्ते करण्यात आला. माजी आमदार मोहनराव कदम आणि डॉ. शिवाजीराव कदम यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या स्पर्धेने ग्रामीण संस्कृती जपण्याचा संदेश दिला. अशा उपक्रमांमुळे तरुण पिढीला आपल्या परंपरेची ओळख होते आणि पशुधन संवर्धनाचे महत्त्व समजते. आजच्या आधुनिक युगात बैलगाडा शर्यतींकडे केवळ क्रीडा किंवा मनोरंजन म्हणून पाहता येणार नाही. या स्पर्धा शेतकरी संस्कृतीचे संरक्षण, देशी गोवंशाचे संवर्धन आणि ग्रामीण समाजजीवनाची एकात्मता टिकवून ठेवण्याचे कार्य करतात. महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांसाठी बैल हा केवळ प्राणी नसून त्यांच्या श्रम, संस्कृती आणि आत्मसन्मानाचे प्रतीक आहे. म्हणूनच ग्रामीण महाराष्ट्रात आजही एकच नाद घुमत असतो, नाद एकच, बैलगाडा शर्यत ! हा नाद केवळ वेगाचा नाही, तर परंपरा, संस्कृती, अस्मिता आणि खिलार संवर्धनाच्या अखंड प्रवासाचा आहे. या परंपरेचे जतन करणे म्हणजे महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे संरक्षण करणे होय.



# विटा हायस्कूलमध्ये नविन विद्यार्थ्यांचे वाजत गाजत स्वागत

**विटा / प्रतिनिधी:-**

विटा शहरातील नामांकित हायस्कूल रयत शिक्षण संस्थेचे, विटा हायस्कूल व संजय भगवानराव पवार ज्युनिअर कॉलेज विटा या ठिकाणी दि. १५ जून रोजी वार सोमवार पासून शाळा सुरू झाली. शाळेच्या पहिल्या दिवशी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे तसेच मागील शैक्षणिक वर्षात विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे ढोल ताशांच्या गजरात मोठ्या आनंदात स्वागत करण्यात आले.

या प्रवेशोत्सव कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून रयत शिक्षण संस्था दक्षिण विभाग सांगलीचे माजी चेअरमन माधवराव मोहिते दादा तर प्रमुख पाहुणे म्हणून विटा नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. काजलताई म्हेत्रे या होत्या. तसेच प्रमुख उपस्थितान मध्ये सुभाषराव पाटील (बापू ), उत्तमराव पवार, सुमित भैय्या गायकवाड, नंदकुमार पाटील,संजय म्हेत्रे इ. मान्यवर उपस्थित होते.

नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे नवीन पाठ्यपुस्तक, पेन आणि गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत उत्तुंग यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा आणि एनएमएमएस परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे फेटा बांधून गुलाब पुष्प देऊन येथोचित सत्कार करण्यात आला.

प्रस्ताविकेमध्ये विद्यालयाचे प्राचार्य जाधव सर यांनी, विटा हायस्कूल दिवसेंदिवस कशी सर्वांगीण प्रगती करत आहे हे सांगितले. तसेच शाळेच्या अमृत महोत्सवी वर्षात दहावी बोर्ड परीक्षेत विद्यालयातील संसिद्धी विठ्ठल जगताप या विद्यार्थिनीने १०० टक्के गुण मिळवून राज्यात सर्वप्रथम क्रमांक मिळवला. तसेच त्यांनी विविध यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव केला.

तसेच प्रमुख पाहुणे नगराध्यक्षा सौ. काजलताई म्हेत्रे यांनीही आपल्या मनोगतामध्ये शहरातील विटा हायस्कूल हे एक नामांकित विद्यालय आहे आणि यातून गुणवत्ताधारक विद्यार्थी घडतात असे सांगितले त्यांच्या हस्ते विविध विद्यार्थ्यांचा गुणगौरवही करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाचे उपमुख्याध्यापक अरुण काळे सर,पर्यवेक्षक सतीश माने सर,सौ रास्कर मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाच्या उपशिक्षिका सौ. पाटील एम. ए., सौ. बाळीकाई ए. एस. मॅडम यांनी केले तर आभार विद्यालयाचे उपमुख्याध्यापक काळे यांनी मानले.

# गृह रक्षक दलाचे पलटण नायक श्री. शंकर यशवंत देसाई यांचा सत्कार



**तळमावले/प्रतिनिधी: -**

शिवसमर्थ परिवाराच्या सामाजिक बांधिलकीचा आणखी एक आदर्श नमुना म्हणून गृह रक्षक दलाचे पलटण नायक शंकर यशवंत देसाई यांच्या सेवानिवृत्ती निमित्त सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. समाजातील कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक व जनसेवेसाठी आयुष्य वेचलेल्या व्यक्तींचा गौरव करण्याची परंपरा शिवसमर्थ परिवाराने सातत्याने जपली असून, त्याच परंपरेचा भाग म्हणून हा सोहळा उत्साहात पार पडला.

उपस्थितांनी श्री. देसाई यांच्या सेवाकार्याचा गौरव करताना शिवसमर्थ परिवाराच्या समाजाभिमुख उपक्रमांचेही विशेष कौतुक केले. सामाजिक, शैक्षणिक, सहकार आणि जनकल्याणाच्या क्षेत्रात शिवसमर्थ परिवाराने उभे केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे मत अनेक मान्यवरांनी व्यक्त केले.

समाजातील चांगल्या कार्याचा सन्मान व्हावा, सेवाभावी व्यक्तींना प्रोत्साहन मिळावे आणि नव्या पिढीसमोर आदर्श निर्माण व्हावा या उद्देशाने शिवसमर्थ परिवार सातत्याने विविध उपक्रम राबवत असून, हा सत्कार त्याच विचारसरणीचे प्रतीक ठरला.

श्री. शंकर यशवंत देसाई यांच्या सेवानिवृत्ती सत्कार समारंभाची निमंत्रण पत्रिका देण्यासाठी शिवसमर्थ परिवाराचे अध्यक्ष श्री. बोत्रे साहेब यांच्याकडे गेल्यानंतर त्यांनी एक विशेष आठवण सांगितली. ते म्हणाले की, तरुणपणापासूनच त्यांना गृह रक्षक दलाविषयी विशेष आकर्षण होते. होमगार्डमध्ये सहभागी होऊन देश व समाजसेवेचे कार्य करण्याची त्यांची प्रबळ इच्छा होती. गृह रक्षक दलाची शिस्त, सेवाभाव आणि संकटकाळात जनतेच्या मदतीसाठी सदैव तत्पर राहण्याची परंपरा याबद्दल त्यांना विशेष आदर वाटत असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

या प्रसंगी केंद्रनायक वरांडे साहेब, सातारा जिल्हा होमगार्ड समादेशक अमोल मोटे, तालुका समादेशक अधिकारी अमोल जंगम, कारकून अधिकारी हेमंत थोरात, पलटण अधिकारी दिलीप भोसले, पश्चिम महाराष्ट्रातील शैक्षणिक व सामाजिक कार्यकर्ते अक्षय चव्हाण, शिवसमर्थ मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, तळमावले यांचे प्रतिनिधी विक्रम निकम, कराड नगरपरिषदेचे सफाई कर्मचारी सचिन भोसले तसेच सुमारे २०० पुरुष व महिला होमगार्ड जवान उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शंकर देसाई यांच्या ३५ वर्षांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेला सलाम करत त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सत्काराला उपस्थित सर्वांच्या वतीने शिवसमर्थ परिवारातर्फे यशवंत देसाई व त्यांच्या पत्नी सौ. साधना शंकर देसाई यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.





# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचा नवा उत्साह

**अक्कलकोट/प्रतिनिधी:-**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयात सोमवार दिनांक १५ जून २०२६ रोजी शाळेचा पहिला दिवस म्हणून संस्थेचे संस्थापक कै. पंचप्पा कल्याणशेट्टी व शिक्षणाची जननी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक मराठी, कन्नड व सेमी इंग्रजी माध्यमाच्या सर्व मुलांना संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी, संस्थेच्या शिक्षण विभाग प्रमुख सौ रूपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ पूनम कोकळगी यांनी औक्षण केले. त्यानंतर गुलाबपुष्प व चिक्की, चॉकलेट देऊन सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. तद्नंतर विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहात व आनंदात शाळेत प्रवेश केला. यावेळी शासनाकडून आलेले पाठ्यपुस्तक सर्व विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

> शाळेचा पहिला दिवस म्हणून संपूर्ण शाळा सजवले होते. गेटवर सुंदर रांगोळी, दर्शनी भागात रंगीबेरंगी फुगे लावले होते. सेल्फी पॉईंट मधून विद्यार्थी फोटो काढत होते, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व आनंद दिसून आला.

यावेळी संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप आदी मराठी, कन्नड, सेमी विभागाचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

## अक्कलकोट नगरपरिषद प्राथमिक मराठी मुला-मुलींच्या शाळेत

# नगराध्यक्ष मिलनदादा कल्याणशेट्टी यांनी केले विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत



**अक्कलकोट/महेश गायकवाड:-**

अक्कलकोट नगरपरिषद प्राथमिक मराठी मुला-मुलींच्या शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाचे नगराध्यक्ष मिलनदादा कल्याणशेट्टी यांनी स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत आज सोमवार दि. १५ जून २०२६ नगरपरिषद प्राथमिक मराठी मुला-मुलींच्या शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. शाळेच्या परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, शुभेच्छा देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्त्री शिक्षणाच्या जनक सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित शाळेत उपस्थित राहून गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्याचे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमास अक्कलकोट नगरपरिषदेचे नगराध्यक्ष मिलनदादा कल्याणशेट्टी, शिक्षण मंडळ सभापती कु. अपर्णा सिद्धे, नगरसेवक नावेद ढागे तसेच नगरसेविका अमृता शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, गणवेश, शालेय बॅग तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. आवश्यक शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

नगराध्यक्ष मिलनदादा कल्याणशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना मन लावून शिक्षण घेण्याचे आवाहन करत शिक्षण हेच यशाचे खरे साधन असल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नगरपरिषद सदैव कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात झाल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.



# विट्यातील बिरोबा मंदिरात धनगर समाज बांधवांकडून अभिषेक

## धार्मिक विधीप्रमाणे पूजन

**विटा / प्रतिनिधी:-**

विटा शहरातील विटा रोकडे गल्ली येथून श्री बिरोबा मंदिर देवालयाकडे रस्ता जातो. या बिरोबा मंदिरामध्ये सालाबाद प्रमाणे नव्याच्या पौर्णिमेला विटा शहरातील सर्व पालख्या एकत्र येऊन या ठिकाणी मोठा सोहळा साजरा केला जातो. धार्मिक विधीप्रमाणे कार्यक्रम पार करत या ठिकाणी धनगरी ओव्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. याच बिरोबा मंदिरात मंदिर परिसरात प्रत्येक अमावस्याला मंदिरामध्ये अभिषेक सोहळा पार पडतो. धार्मिक विधीप्रमाणे बिरोबा देवाचे पूजन व आरती म्हटली जाते.

अमावस्याला बिरोबा मंदिर येथे युवराज ( नाना) म्हकू मेटकरी व सौभाग्यवती सुनंदा युवराज मेटकरी व सर्व समस्त धनगर समाज बांधवांच्या उपस्थितीत धार्मिक विधीप्रमाणे अभिषेक सोहळा पार पडला. यावेळी अभिषेक सोहळा पार पडल्यानंतर युवराज नाना म्हकू मेटकरी यांच्या वतीने प्रसादाचे लाडूचे वाटप करण्यात आले.

या वेळी प्रमुख उपस्थिती, सुभाष ( आप्पा) मेटकरी, संजय जयसिंग मेटकरी, नामदेव राजाराम मेटकरी, महेश मेटकरी, सचिन भोसले, सूर्यकांत गिड्डे, मारुती मेटकरी, विलास सपकाळ, सौभाग्यवती लता सपकाळ, गोरखनाथ कांबळे, तांदळे मामी,जयश्री कांबळे, सह समस्त धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी धार्मिक विधी पार पडल्यानंतर धनगर समाज बांधवांना श्री बिरोबा राया यांचे महात्म्य सांगितले, या वेळी आई मायाक्का देवीचे ही पूजन करण्यात आले.

# याम बेनेगल यांचे चित्रपट वास्तववादी आणि कलात्मक:भारत सासणे

**सातारा/प्रतिनिधी:-**

श्याम बेनेगल यांच्या चित्रपटांमध्ये ग्रामीण भारतातील सरंजामशाही, जातीयवाद, महिलांचे शोषण आणि मानवी हक्कांचे प्रश्न प्रकर्षाने मांडले गेले आहेत. लेखिका डॉ. सविता नायक-मोहिते यांनी 'श्याम बेनेगल: एक व्यक्ती एक दिग्दर्शक' या पुस्तकातून त्यांच्या या वैशिष्ट्यांवर योग्य प्रकाश टाकला असून, हे आशयघन पुस्तक नवोदित दिग्दर्शकांसाठी एक उत्तम शैक्षणिक मार्गदर्शक ठरेल, असे उद्गार ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांनी काढले. येथील 'आम्ही पुस्तक प्रेमी समूह' आणि 'दीप लक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित' यांच्या संयुक्त विद्यमाने दीप लक्ष्मी पतसंस्थेच्या सभागृहात या पुस्तक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात श्री. सासणे बोलत होते. बेनेगल यांच्या दिग्दर्शकीय प्रवासाचा पट बहुभाषिक वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे पुस्तक इंग्रजी, हिंदी आणि उर्दू भाषांमध्ये अनुवादित करून प्रकाशित करावे, असा मोलाचा सल्लाही त्यांनी यावेळी लेखिकेला दिला.



चर्चासत्राचे उद्घाटन करताना भारत सासणे डावीकडून शिरीष चिटणीस, सविता कारंजकर, श्रीराम नानल, संदीप श्रोत्री, विनोद कुलकर्णी, बाळासाहेब लबडे, सविता नायक मोहिते व सीमंतिनी नुलकर

कार्यक्रमाच्या प्रारंभी 'आम्ही पुस्तक प्रेमी समूहा'चे संस्थापक डॉ. संदीप श्रोत्री यांनी समूहाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. श्याम बेनेगल हे एक व्यक्ती आणि दिग्दर्शक म्हणून कसे मोठे होते, हे त्यांनी विविध उदाहरणांसह स्पष्ट केले. सविता नायक-मोहिते यांचे हे पुस्तक केवळ दिग्दर्शकाचे आत्मचरित्र नसून, त्यांच्या चित्रपटांचा आणि दिग्दर्शकीय भूमिकेचा तो एक सखोल शैक्षणिक अभ्यास आहे, असे डॉ. श्रोत्री म्हणाले. त्यानंतर ज्येष्ठ लेखक प्रा. बाळासाहेब लबडे यांनी बेनेगल यांच्या चित्रपटांमागची भूमिका उलगडताना 'अंकुर', 'निशांत', 'मंथन', 'सरदारी बेगम' आदी चित्रपटांचा विस्तृत आढावा घेत त्यातील कथाप्रसंग श्रोत्यांसमक्ष जिवंत केले. शबाना आजमी, नसिरुद्दीन शाह, स्मिता पाटील यांसारख्या कसदार कलावंतांना घडवण्यामध्ये बेनेगल यांची मोठी भूमिका होती, असे प्रा. लबडे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात नमूद केले.

महिलांच्या प्रश्नांवर सतत आग्रही भूमिका घेणाऱ्या ज्येष्ठ पर्यावरणवादी लेखिका ड. सीमंतिनी नुलकर यांनी बेनेगल यांच्या चित्रपटातील स्त्री आणि तिची बंडखोर वृत्ती यावर प्रकाश टाकला. विशेषतः 'अंकुर' चित्रपटातील कथानक, स्त्री व्यक्तिरेखा आणि अभिनय याविषयी त्यांनी विस्ताराने विश्लेषण केले. या प्रसंगी ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक श्रीराम नानल यांनी मुंबईतील 'मेट्रो' सिनेमा गृहात झालेल्या 'अंकुर' सिनेमाच्या प्रीमियर शोच्या ऐतिहासिक आठवणींना उजाळा दिला. हे पुस्तक प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, कलादृष्टीचा आणि चित्रपटसृष्टीतील योगदानाचा अत्यंत अभ्यासपूर्ण वेध घेते, असे प्रतिपादन त्यांनी आपल्या मनोगतात केले. तर, शिरीष चिटणीस यांनी भारतीय चित्रपटसृष्टीचा एकूण आढावा घेत श्याम बेनेगल यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा भावपूर्ण उल्लेख केला.

पुस्तकाच्या लेखिका डॉ. सविता नायक-मोहिते यांनी पुस्तक निर्मितीचा प्रवास सांगताना, एका शैक्षणिक प्रकल्पाच्या निमित्ताने श्यामबाबू (बेनेगल) यांच्याशी झालेली पहिली भेट आणि त्यानंतर सुरू झालेली लेखनप्रक्रिया यावर प्रकाश टाकला. आपल्या वैद्यकीय पेशाचा संदर्भ देत त्या म्हणाल्या की, आम्ही डॉक्टर मंडळी एंडोस्कोपी, ईसीजी, एक्स-रे अशा विविध मार्गांनी रुग्णाचे शरीर तपासतो; पण त्याने माणसाचे 'मन' दिसत नाही. माणसाचे हे अंतरंग बघण्याचे आणि तपासण्याचे काम साहित्य करते. त्यांच्या या उद्गारातून त्यांचे साहित्यावरील निस्सीम प्रेम दिसून आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. संदीप श्रोत्री यांनी भारत सासणे यांचे, तर श्रीराम नानल यांनी प्रा. बाळासाहेब लबडे यांचे स्वागत केले. अध्यक्ष या नात्याने भारत सासणे यांनी लेखिका डॉ. सविता नायक-मोहिते, ड. सीमंतिनी नुलकर आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य विनोद कुलकर्णी यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन सविता कारंजकर यांनी केले. साताऱ्यात अशा एका दर्जेदार आणि आगळ्यावेगळ्या चर्चासत्राचे आयोजन केल्याबद्दल उपस्थित रसिक सातारकरांनी आयोजकांचे विशेष आभार मानले.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# महाबळेश्वरच्या हेरिटेज ग्रेड-१ गोल्फ कोर्सवरील कथित पर्यावरण विध्वंसाला कायदेशीर वळण

## पाहणीनंतर अध्यक्ष, सचिव व ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतापगड/प्रतिनिधी:–**

महाबळेश्वर नगरपरिषद हद्दीतील हेरिटेज ग्रेड-१ दर्जा प्राप्त ऐतिहासिक गोल्फ कोर्स परिसरात कथित बेकायदेशीर वृक्षतोड, उत्खनन, अंतर्गत रस्ते निर्मिती आणि अनधिकृत बांधकामे झाल्याच्या आरोपांनंतर प्रशासनाने केलेल्या पाहणीला अवघ्या काही दिवसांत मोठे कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले आहे. उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी डॉ. योगेश खरमाटे यांच्या प्रत्यक्ष पाहणीत गंभीर स्वरूपाच्या अनियमितता निदर्शनास आल्यानंतर आता महाबळेश्वर पोलीस ठाण्यात द क्लब महाबळेश्वरच्या अध्यक्षा, सचिव आणि संबंधित ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत असलेले हे प्रकरण आता चौकशी आणि फौजदारी कारवाईच्या टप्प्यावर पोहोचले आहे.

महाबळेश्वर नगरपालिका हद्दीतील सिटी सर्व्हे क्रमांक ११७ व ११८ मधील 'द क्लब'च्या मालकीचे गोल्फ मैदान हे ब्रिटिशकालीन वारसा लाभलेले असून त्याचा समावेश हेरिटेज ग्रेड-१ मिळकतींमध्ये करण्यात आला आहे. या मैदानातील सुमारे ६० ते ६५ एकर जागा श्री क्षेत्र महाबळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या मालकीची असून ब्रिटिश काळात ती 'द क्लब'ला ९९ वर्षांच्या भाडेकराराने देण्यात आली होती. वेण्णा सरोवराच्या सान्निध्यात वसलेला हा परिसर पर्यावरणीय, ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. विशेष म्हणजे हा परिसर केंद्र सरकारने घोषित केलेल्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात (इको सेन्सिटिव्ह झोन) समाविष्ट आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, द क्लब महाबळेश्वरचे सचिव लेफ्टनंट कर्नल गौतम नंदी यांनी गोल्फ मैदानाचे सपाटीकरण करून गवत लागवडीसाठी तहसीलदार कार्यालयाकडून २० फेब्रुवारी २०२६ रोजी परवानगी घेतली होती. मात्र, या परवानगीच्या चौकटीबाहेर जाऊन मोठ्या प्रमाणात उत्खनन, वृक्षतोड, अंतर्गत रस्ते निर्मिती तसेच मोठ्या आकाराच्या पत्र्याच्या शेडचे बांधकाम करण्यात आल्याच्या तक्रारी पुढे आल्या. काही ठिकाणी तोडलेले वृक्ष जमिनीत पुरून पुरावे नष्ट करण्याचाही प्रयत्न झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. याशिवाय संपूर्ण परिसराभोवती उंच तारांचे कुंपण उभारण्यात आल्याने स्थानिक नागरिकांच्या वावरावर मर्यादा आल्याची तक्रारही करण्यात आली. या प्रकाराबाबत बॉम्बे एन्व्हायरमेंट क्शन ग्रुपचे चेअरमन अनिल पंडित आणि पर्यावरणप्रेमी सूर्यकांत पांचाळ यांनी प्रशासनाकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीची दखल घेत प्रांताधिकारी डॉ. योगेश खरमाटे यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान महसूल, नगरपालिका आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून परवानगीच्या अटी व प्रत्यक्ष सुरू असलेल्या कामांची माहिती घेण्यात आली. यावेळी महाबळेश्वर नगरपालिकेचे मुख्याधिकारी योगेश पाटील आणि तहसीलदार सचिन मस्के यांनी परवानगी घेतलेल्या कामांव्यतिरिक्त अन्य कामांची माहिती प्रशासनाकडे नसल्याचे सांगितल्याने प्रांताधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती.

महाबळेश्वर तहसील कार्यालय आणि नगरपालिका कार्यालयापासून अगदी जवळ असलेल्या या परिसरात अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या कामांची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना कशी नव्हती, असा प्रश्न स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींकडून उपस्थित करण्यात आला. त्यानंतर प्रांताधिकाऱ्यांनी महसूल, नगरपालिका आणि वन विभागाला संयुक्त पंचनामा करण्याचे आदेश दिले. तसेच परवानगीच्या अटींचा भंग झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित दोषींवर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश दिले आणि सुरू असलेले शेडचे काम तात्काळ थांबविण्याचे आदेशही दिले. प्रशासनाच्या या कारवाईनंतर प्रकरणाला आणखी वेग आला आणि अखेर महाबळेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणात द क्लब महाबळेश्वरच्या अध्यक्षा मनिषा गोखले शहा, सचिव लेफ्टनंट कर्नल गौतम नंदी (निवृत्त) तसेच द्वारकाधीश कन्स्ट्रक्शन वर्क्स, मेढा येथील सुहास पार्टे यांच्याविरुद्ध महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन व संवर्धन अधिनियम, १९७५ मधील कलम २१(१)(२), ११ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३२४(४) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाबळेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बी. पी. सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस अधिकारी अवघडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तपासादरम्यान प्रत्यक्षात किती वृक्षतोड झाली, उत्खननाची व्याप्ती किती होती, कोणत्या परवानग्या घेण्यात आल्या होत्या आणि संबंधितांची जबाबदारी कितपत आहे याचा सखोल शोध घेतला जाणार आहे.

महाबळेश्वरसारख्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठिकाणी झालेल्या कथित वृक्षतोड व पर्यावरणीय ऱ्हासामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणात महाराष्ट्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, पर्यावरण संरक्षण कायदा तसेच महाराष्ट्र भूमी महसूल संहितेअंतर्गतही पुढील कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक संघटनांकडून करण्यात येत आहे. आता संयुक्त पंचनामा, चौकशी अहवाल आणि पोलीस तपासातून नेमकी वस्तुस्थिती समोर येऊन पुढे कोणती कारवाई होते, याकडे संपूर्ण महाबळेश्वरचे लक्ष लागले आहे.

# बॉटनिकल गार्डनच्या विकासाच्या नावाखाली शहराचे भकासीकरण नको : ॲड. संदीप कांबळे

**फलटण/प्रतिनिधी:–**

फलटण शहरात वनीकरणाच्या जागेत बोटॅनिकल गार्डन करण्याच्या उद्देशाने नैसर्गिक स्तोत्र असलेल्या तळ्यामध्ये सध्या फलटण शहरात चालू असणाऱ्या रस्त्याच्या काम ातील झालेल्या खोदकामातून निघालेल्या मुरूम दगड माती इत्यादी टाकाऊ मटेरियल येथे आणून टाकले जात आहे.

नैसर्गिक पाण्याचे असलेले तळे याचे खोलीकरण करून पाण्याची साठवण वाढवणे गरजेचे असताना त्यामध्ये बोटॅनिकल गार्डनच्या नावाखाली विनापरवाना गौण खनिज तसेच नव्याने सुरू असलेल्या रस्त्यावर झालेल्या खोदकामातून काढलेले डांबर व इतर टाकाऊ पदार्थ टाकून नैसर्गिक तळे नष्ट करून त्या ठिकाणी नेमकं कोणाच्या फायद्या करता बोटॅनिकल गार्डन तयार होत आहे तसेच गिरवी नाका परिसरात होणाऱ्या पावसाचे संपूर्ण पाणी सदर तळ्यात निचरा होत असून सदर तळे मुजवल्यास सदर पाणी हे नियोजित बॉटनिकल गार्डन शेजारी असणाऱ्या गणपती मंदिर तसेच जवळच असणाऱ्या लहान मुलांच्या शाळेकडे वाहणार असून त्या ठिकाणी पूरस्थिती सारखी परिस्थिती पावसाळ्यात निर्माण होण्याची दाट शक्यता असताना तसेच ही संपूर्ण बाब वनविभागाच्या निदर्शनास आणून दिलेली असताना देखील वनविभाग कोणाच्या तरी फायदा करता सदर ठिकाणी बॉटनिकल गार्डन तयार करत आहे. या तळ्यात टाकण्यात येणारा गौण खनिज हे महसूल विभागाच्या पूर्वपरवानगीनुसार का विनापरवाना चालू आहे. त्याची रॉयल्टी नियमानुसार भरलेली आहे का नाहीवतीने दिसून येत आहे. याबाबत या बेकायदेशीर कृती बाबत सखोल चौकशी होऊन सदर बॉटनिकल गार्डन कायदेशीर अवैधरित्या जर असेल तर सदर गोष्टींमध्ये ज्या अधिकारी कर्मचारी आणि ठेकेदार सहभागी आहेत. यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिवसेनेच्या वतीने ड. संदीप शिवाजीराव कांबळे यांनी केली आहे. या गंभीर बाबी बाबत लवकरच जिल्हा अधिकारी सातारा, महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांची भेट घेऊ न तक्रार करण्याचे यावेळी नमूद केले आहे.असेही प्रश्न अनुत्तरीत आहेत.

तीन वर्षासाठी फलटण शहरामध्ये येणारे अधिकारी फलटण शहराच्या विकासाच्या नावाखाली फलटण शहर भ कास करणार का? याची नोंद समस्त फलटणकरांनी घ्यावी तसेच याबाबत वनविभागाचे कनिष्ठ आणि वरिष्ठ अधिकारी यांना वेळोवेळी ही बाब निदर्शनास आणून देखील ते गांधारीच्या भूमिकेत आहेत. ही बाब संशयास्पद आहे. असा संभ्रम फलटणकर नागरिकांच्या वतीने दिसून येत आहे. याबाबत या बेकायदेशीर कृती बाबत सखोल चौकशी होऊन सदर बॉटनिकल गार्डन कायदेशीर अवैधरित्या जर असेल तर सदर गोष्टींमध्ये ज्या अधिकारी कर्मचारी आणि ठेकेदार सहभागी आहेत. यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिवसेनेच्या वतीने ड. संदीप शिवाजीराव कांबळे यांनी केली आहे. या गंभीर बाबी बाबत लवकरच जिल्हा अधिकारी सातारा, महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांची भेट घेऊ न तक्रार करण्याचे यावेळी नमूद केले आहे.

# कराड प्रधान डाक कार्यालयात रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**कराड/प्रतिनिधी : –**

जागतिक रक्तदाता दिनाचे औचित्य साधत भारत सरकारच्या डाक विभागातर्फे कराड प्रधान डाक कार्यालयात आयोजित रक्तदान शिबिराला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रक्तदानासारख्या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमातून मानवतेचा संदेश देत अनेकांनी स्वेच्छेने रक्तदान केले.




शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी कराड विभागाच्या डाक अधीक्षिका स्वाती दळवी यांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करताना, रक्तदान हे केवळ श्रेष्ठ दान नसून, जीवनदान आहे. अपघातग्रस्तांबरोबरच विविध गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांसाठी रक्ताची नितांत गरज असते. त्यामुळे समाजातील प्रत्येक नागरिकाने रक्तदान चळवळीत सहभागी होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन केले.

या उपक्रमासाठी वेणुताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाने सहकार्य केले. रक्तसंकलनाची संपूर्ण प्रक्रिया नियोजनबद्ध व सुरळीतपणे पार पडली. यावेळी डाक अधिकारी दत्तात्रय खेडेकर, गणेश पाटील, अमित देशमुख, कौशल कुलकर्णी, पोस्टमास्तर रामलिंग राजमाने यांच्यासह रुग्णालयाचे डॉ. धीरज कांडे, सविता भाट, नागनाथ केंद्रे, मीनाज शेख, महेश शिंदे, पूर्वा वसावे, शिल्पा बागल, साठे आदी उपस्थित होते.कार्यक्रमात विविध मान्यवरांनी रक्तदानाचे सामाजिक व वैद्यकीय महत्त्व विशद केले.

सूत्रसंचालन परमेश्वर केंद्रे यांनी केले. शिबिरात सहभागी झालेल्या रक्तदात्यांचा वेणुताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयातर्फे प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या शिबिरात अमित देशमुख, चंद्रकांत पवार, परमेश्वर केंद्रे, महेश लोहारे, सखाराम देवकाते, जी. के. पाटील, शंकर सुतार, श्रीराम शिंदे, नितीन पाटील, प्रवीण माने, सुभाष महानवर, विजय उगले, हर्ष, रामकिशोर गुप्ता यांच्यासह कराड विभागातील अनेक डाक कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले.

# गावातच मिळणार इंग्रजीचे धडे ३७ शाळांना सेमी इंग्रजीची मंजुरी

**सातारा / प्रतिनिधी:–**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि स्पर्धात्मक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सातारा जिल्हा परिषद शिक्षण विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून जिल्हा परिषदेच्या ३७ प्राथमिक शाळांमध्ये सेमी इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली असून, या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणित आणि विज्ञान विषयांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून मिळणार आहे.

सध्या स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील पालकांचा कल इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे वाढत आहे. गावोगावी खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या वाहनांद्वारे विद्यार्थ्यांना आकर्षित केले जात असल्याने जिल्हा परिषद शाळांच्या पटसंख्येवर परिणाम होत असल्याची बाब पुढे आली होती. यामुळे अनेक गावांमधून जिल्हा परिषद शाळांमध्येच सेमी इंग्रजी माध्यम सुरू करण्याची मागणी होत होती.

> ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि स्पर्धात्मक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सातारा जिल्हा परिषद शिक्षण विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून जिल्हा परिषदेच्या ३७ प्राथमिक शाळांमध्ये सेमी इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली असून, या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणित आणि विज्ञान विषयांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून मिळणार आहे.
>
> – अनिस नायकवडी
> प्राथमिक शिक्षणाधिकारी, जि. प. सातारा

शिक्षण सभापती तेजस्विनी कदम, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी अनिस नायकवडी यांच्याकडे नागरिकांनी याबाबत मागणी केली होती. त्यानुसार प्राथमिक शिक्षण विभागाने संबंधित शाळांकडून प्रस्ताव मागविले. प्राप्त प्रस्तावांची छाननी करून ३७ शाळांमध्ये सेमी इंग्रजी माध्यम वर्ग सुरू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गावातच इंग्रजी माध्यमाचा अनुभव मिळणार असून, गणित व विज्ञान विषयांची इंग्रजीतील गोडी वाढण्यास मदत होणार आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचे शहरांकडे किंवा खासगी शाळांकडे होणारे स्थलांतर कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सेमी इंग्रजी माध्यमाच्या वर्गांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार असून, स्पर्धात्मक परीक्षांमध्येही त्यांना भविष्यात फायदा होणार आहे. जिल्हा परिषद शाळांबाबत पालकांचा विश्वास अधिक दृढ होण्यास या निर्णयामुळे मदत मिळणार असल्याचे शिक्षण क्षेत्रातून सांगितले जात आहे.

कोरेगाव तालुका : भाटमवाडी, तडवळे, समंत कोडोली, बोरजाईवाडी, पेठ किन्हई, भाडळे, वाठारगाव, तांदुळवाडी, किरोली, वाठार किरोली क्र. १ व २, नहरवाडी, पिंपरी, रेवडी, कण्हेरखेड, बिचुकले, दाणेवाडी, फडतरवाडी, जाधववाडी, इंदिरानगर (वाठार स्टेशन), वाठार स्टेशन, नलवडेवाडी (बि), नांदवळ, तडवळे स., वाघोली, रेवडी.माण तालुका : शिखर शिंगणापूर, गायदरा.खटाव तालुका : कुमठे (नागाचे), निमसोड क्र. २, गुरसाळे.पाटण तालुका : पेठशिवापूर.खंडाळा तालुका : कोपर्डे.फलटण तालुका : सुरवडी.जावळी तालुका : सर्जापूर, सनपाने, बेलावडे, महिगाव.



# माजी आ.स्व.व्यंकाप्पा पत्की वंचितांच्या न्याय हक्कासाठी लढले: प्रदिपकुमार पाटील

**ईश्वरपूर/प्रतिनिधी : –**

जेष्ठ समाजवादी नेते, माजी आमदार स्व. व्यंकाप्पा पत्की (सर) यांच्या १२ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त राजारामबापू सहकारी साखर कारखान्याच्या कारंदवाडी युनिट कार्यस्थळावर त्यांच्या पुतळ्यास त्यांचे सुपूत्र डॉ.निलेश पत्की यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी राजारामबापू साखर कारखान्याचे संचालक प्रदीपकुमार पाटील, रमेश आप्पा हाके, वैभव वसंतराव रकटे, रघुनाथ जाधव, माजी संचालक श्रेणिक कबाडे, प्रा.बाळासाहेब मासुले, दिनकर पाटील, प्र.कार्यकारी संचालक विजयराव मोरे, सचिव डी.एम.पाटील प्रामुख्याने उपस्थित होते.

स्व.व्यंकप्पा पत्की सरांनी आयुष्यभर समाजवादी विचारांची जोपासना करीत समाजा तील शेतकरी, शेतमजूर, कामगार, मागासवर्गीय, युवक, महिला आदी वंचित, शोषित घटकांच्या हक्कासाठी अखंड संघर्ष केला आहे. ते एक अभ्यासू आणि संघर्षशील नेते होते. त्यांनी लोकनेते राजारामबापू पाटील यांच्याशी कायम निष्ठा ठेवत माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांना मार्गदर्शन केलेले आहे, अशी भावना मान्यवरांनी व्यक्त केली.

यावेळी चीफ केमिस्ट उमेश शेटे, डे.चीफ इंजिनियर संग्राम चव्हाण, सुरक्षा अधिकारी जयवंत पाटील, अतुल मुतालिक, प्रवीण पाटील, प्रशांत गायकवाड, संजय शिंदे, आनंदराव सूर्यवंशी, अनिल नांद्रे, संग्राम पाटील, दुर्गेश कुलकर्णी, विजयराव पाटील, रवींद्र चौगुले, जगदीश साळुंखे, अकिल मुजावर, प्रतापराव गुरव, श्रीधर चव्हाण, तसेच अधिकारी, कर्मचारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# लेंगरे ग्रामपंचायतीचे सदस्य अशपाक पिरजादे यांचा कार्यकर्त्यांनसह भाजपमध्ये प्रवेश

**विटा / प्रतिनिधी:–**

लेंगरे ता. खानापूर हे गाव सामाजिक क्षेत्राबरोबर राजकीय क्षेत्रात कायमच अग्रेसर आहे. शिवाय या गावातील राजकारण थोडे जरी वेगळे असले तरी कोण कधी कुठे प्रवेश करेल आणि कधी कोणत्या पक्षाला धक्का बसेल हे सांगता येणार नाही. भाजपचे युवा नेते ड वैभव दादा पाटील यांच्या उपस्थितीत लेंगरे ग्रामपंचायतीचे सदस्य अश्फाक पिरजादे यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केल्याने लेंगरे भागात आता विरोधकांना मोठा धक्काच म्हणावे लागेल,कारण आगामी काळात निवडणूकीत या मतदारसंघात भाजपला नक्कीच अच्छे दिन येथील असे चित्र आता या पक्षप्रवेश मुळे दिसून येत आहे.



खानापूर तालुक्यासह आटपाडी आणि विसापूर सर्कलमध्ये विटा नगरीचे माजी नगराध्यक्ष ॲड. वैभव दादा पाटील यांनी मतदारसंघात भाजपचा प्रसार करण्यास सुरुवात केली आहे. भाजप हा देशातील नंबर एक पक्ष आहे, असे म्हणत वैभव दादा पाटील यांनी मतदारसंघात संपर्क अभियान सुरू केले आहे. आ. गोपीचंद पडळकर व ब्रह्मानंद पडळकर व भाजपचे पदाधिकारी यांनी वैभव दादा पाटील यांना जोमाने साथ दिली आहे. तसेच सतत या मतदारसंघात वैभव दादा पाटील यांचा जनसंपर्क वाढला आहे. भाजपची ताकद वाढवण्यासाठी व या मतदारसंघात भाजप पक्ष मजबूत करण्यासाठी सातत्याने वैभव पाटील आमदार गोपीचंद पडळकर व ब्रह्मानंद पडळकर यांना बरोबर घेऊन नागरिकांच्या जनसंपर्कात दिसून येत आहेत.

लेंगरे येथील लेंगरे ग्रामपंचायतीचे सदस्य अशपाक पिरजादे व त्यांचे कट्टर समर्थक यांनी खानापूर, आटपाडी आणि विसापूर सर्कलचे माजी आमदार भाजपचे जेष्ठ नेते सदाशिवराव भाऊ पाटील तसेच आ. गोपीचंद पडळकर व ब्रह्मानंद पडळकर यांची विचारधारा जपत भाजपचे युवा नेते ड वैभव दादा पाटील यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केल्याने लेंगरे भागात आता विरोधकांना मोठा धक्काच म्हणावे लागेल. यावेळी ग्रामपंचायतीचे सदस्य अश्फाक पिरजादे म्हणाले, गावच्या विकासासाठी योग्य वेळी योग्य निर्णय मी घेतला आहे. भाजपचे युवा नेते वैभव दादा पाटील तसेच आमदार गोपीचंद पडळकर व ब्रह्मानंद पडळकर तसेच माजी आमदार ॲड. सदाशिवराव भाऊ पाटील यांच्या नेतृत्वाखाली मला या गावात काम करण्याची संधी मिळाली व मी भाजप पक्षासाठी या मतदारसंघात चांगले काम करीन. माझ्या गावासाठी भाजपकडून जेवढे मला या गावच्या विकासासाठी प्रयत्न करता येतील ते मी नक्कीच करीन व प्रामाणिकपणे या पक्षाचे मी काम करीन. असे म्हणत वैभव दादांची साथ कधीच आता आम्ही सोडणार नाही असेही यावेळी लेंगरे ग्रामपंचायतीचे सदस्य अश्फाक पिरजादे यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर आपली स्पष्ट भूमिका मांडली.

तसेच यावेळी भाजपमध्ये सदस्य अश्फाक पिरजादे व त्यांच्या सर्व कार्यकर्त्यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन भाजपचे युवा नेते वैभव दादा पाटील यांनी सत्कार केला.

# विटा न.प.शाळांमध्ये प्रवेशोत्सवातून शिक्षणासोबत पर्यावरण संवर्धनाचा संदेश

## आ.सुहास बाबर

**विटा / प्रतिनिधी:–**

आज विटा नगर परिषदेच्या सर्व शाळांमध्ये प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नगरपरिषदेच्या मराठी शाळांमधील नवीन प्रवेश विद्यार्थी संख्येइतकी झाडे लावण्याचा संकल्प करून शिक्षण आणि पर्यावरण यांची सुंदर सांगड घालण्यात आली.



यावेळी आमदार सुहास भैय्या बाबर, नगराध्यक्षा सौ. काजल काकी म्हेत्रे, नगराध्यक्ष नंदकुमार पाटील, शिक्षण सभापती डॉ. लीलाताई भिंगारदेवे, आरोग्य समिती सभापती भालचंद्र भैया कांबळे, नगरसेविका भाग्यश्री ताई तारळकर, नगरसेवक अविनाश चोथे, रोहित पाटील, रामण्णा भिंगारदेवे तसेच सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाचा शुभारंभ शाळा क्रमांक २ व शाळा क्रमांक ४ मधील नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला. ज्ञानाच्या मंदिरात पहिले पाऊल टाकताना विद्यार्थ्यांच्या हातून हरित भविष्यासाठी रोपांची लागवड करण्यात आली, हा क्षण खरोखरच प्रेरणादायी ठरला.

नवोदित विद्यार्थ्यांचे शाळेचा गणवेश, पाठ्यपुस्तके व पुष्प देऊन उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. शिक्षण, संस्कार आणि पर्यावरण संवर्धन यांचा संदेश देणारा हा प्रवेशोत्सव विद्यार्थ्यांच्या जीवनातील अविस्मरणीय क्षण ठरला.

# यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळा क्र.१ मध्ये विद्यार्थी प्रवेशोत्सव साजरा

## शिक्षण सभापती डॉ. लिलाताई भिंगारदेवे यांची प्रमुख उपस्थिती

**विटा / प्रतिनिधी:–**

यशवंतराव चव्हाण प्राथमिक शाळा क्र.१ या शाळेमध्ये आज प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. त्यावेळी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

विटा नगरपालिकेच्या मराठी शाळा १०० टक्के डिजिटल करून खाजगी शाळांना लाजवेल असे मॉडेल शाळा करण्याचे आश्वासन शिक्षण सभापती सभापती डॉ.लीला भिंगारदेवे यांनी दिले. शाळा मॉडेल करत असताना शाळेतील विद्यार्थ्यांच्या दर्जा सुधारण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव मिळावा. म्हणून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी प्रयत्न करणार आहोत, असे मत शिक्षण सभापती डॉ.लीला भिंगारदेवे यांनी व्यक्त केले.

यावेळी देणगीदार विनोद दिवटे उपस्थित होते. यावेळी शालेय उपयोगी दप्तर, वह्या पुस्तके तसेच गणवेश याचे सुद्धा वाटप करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक भारत आवटी, स्मिता करपे ,शालेय व्यवस्थापन समितीचे




अध्यक्ष देविदास जाधव,तसेच पालक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.


## ग्रामपंचायत बिजवडी ता. इंदापूर जि. पुणे

**निविदा सूचना क्र.१ १/२०२६-२७**

### जाहीर निविदा सूचना प्रसिद्धीकरण

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास विनंती करणेत येते कि, मौजे बिजवडी हद्दीमध्ये १५ वा वित्त आयोग मधून खालीलप्रमाणे विकासकामे मंजूर असून त्याची निविदा प्रक्रिया खालील प्रमाणे.

| अ क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | Providing Horizontal Bore Old Well At-Bijwadi, Tal-Indapur, Dist-Pune | २,४३,४७७/- | ४ महिने | सु.बे.अ करिता |
| २ | Providing Bore Old Well At-Bijwadi, Tal-Indapur, Dist-Pune | १,३९,७६९/- | ४ महिने | सु.बे.अ करिता |

वरील कामासाठी निविदेसाठी दि. १७/०६/२०२६ सकाळी ११.०० ते २२/०६/२०२६ सायंकाळी ०५.०० पर्यंत मुदत आहे. शक्य असल्यास दि. २३/०६/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वा. ग्रा.पं. कार्यालय बिजवडी येथे निविदा उघडण्यात येईल. सदरील निविदा बी-१ वरील तारखेस ग्रा.पं बिजवडी कार्यालयामध्ये उपलब्ध होतील.

निविदेच्या अटी व शर्ती लागु

१. कोणत्याही निविदा रद्द करण्याचा व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा सर्व अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवलेला आहेत.

२. काम पुर्ततेनंतर देयक अदा केले जाईल, अग्रीम देयके दिली जाणार नाही.

३. सिलबंद निविदेच्या लिफाफा क्र. १ मध्ये आवश्यक कागदपत्रांच्या सत्यप्रति सादर कराव्या लागतील

४. उपरोक्त कागदपत्रापैकी एक हि कागदपत्र सादर केलेली नसल्यास सदर ठेकेदारची निविदा बाद करण्यात येईल व आर्थिक लिफाफा कोणतेही कागदपत्र सादर करण्यास कोणतीही वाढीव मुदत दिली जाणार नाही. (Financial Bid) उघण्यात येणार नाही तसेच वरील सर्व अटी व शर्ती अधिन राहुन सदरील कामांची जाहिरात प्रसिद्धी करण्यास देत आहे.

**सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत बिजवडी ता. इंदापूर जि.पुणे**


# कोळेवाडी शाळेत प्रवेश म्हणजे सर्वांगीण शिक्षणाची हमी

## तेजस्विनी कदम; कराड तालुक्यात उत्साही वातावरणात शाळा प्रवेशोत्सव

**कराड/प्रतिनिधी : –**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळेवाडी ही शैक्षणिक गुणवत्ता, कला, क्रीडा, संस्कार व विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविणारी आदर्श शाळा असून, या शाळेत प्रवेश म्हणजे बालकांच्या उज्ज्वल भवितव्याची हमी आहे, असे प्रतिपादन सातारा जिल्हा परिषदेच्या शिक्षण व अर्थ समितीच्या सभापती तेजस्विनी कदम यांनी केले.




जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळेवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमात त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. यावेळी सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, कराड तालुक्याचे गटविकास अधिकारी प्रताप पाटील, गटशिक्षणाधिकारी बिपिन मोरे, माजी उपसभापती रमेश देशमुख, शिक्षण विस्तार अधिकारी संभाजी कानवटे, जमीला मुलाणी, केंद्रप्रमुख आनंदा धायगुडे, माजी सरपंच वसंतराव भोसले, रत्नमाला पाटील आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

सातारा जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत विविध अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या शाळा भेटींचे नियोजन करण्यात आले होते. त्याचाच एक भाग म्हणून कोळेवाडी शाळेला भेट देण्यात आली. यावेळी बोलताना तेजस्विनी कदम यांनी कोळेवाडी शाळेने कला, क्रीडा, बालसंस्कार, मूल्यशिक्षण आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी शाळेतील विविध उपक्रमांची पाहणी केली. विद्यार्थ्यांच्या इंग्रजी संभाषण कौशल्याची त्यांनी विशेष दखल घेतली. तसेच शाळेतील आधुनिक शैक्षणिक सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचेही कौतुक केले. याच प्रसंगी शाळेतील नव्याने उभारण्यात आलेल्या व्हर्च्युअल क्लासरूमचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. गटविकास अधिकारी प्रताप पाटील यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

प्रवेशोत्सवानिमित्त संपूर्ण शाळा परिसर उत्साहाने फुलून गेला होता. फुलांची तोरणे, आकर्षक रांगोळ्या, सजविलेल्या गाडीतून काढण्यात आलेली मिरवणूक, ढोल-ताशांचा गजर, नवीन पाठ्यपुस्तकांचे वितरण, गणवेश, पाटी, चॉकलेट व फुलांच्या भेटी यामुळे नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. आनंदी व चैतन्यमय वातावरणात विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेश मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक भारती लोकरे, सूत्रसंचालन संदीप कोरडे यांनी केले, तर आभार शिक्षण विस्तार अधिकारी जमीला मुलाणी यांनी मानले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष पाटील, उपाध्यक्ष अतुल भागवत, संतोष कुंभार,प्रमोद गायकवाड रमेश सुरवसे,संध्या शेजवळ शोभाताई चव्हाण मंगल पाटील अनिल पाटील रूपाली पाटील आणि समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, विविध कार्यकारी सोसायटीचे पदाधिकारी, ग्रामस्थ, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खुदा का बंदा इरफान माणुसकीची खरी जात

## अपघातात पाच लोकांना वाचवणारा इरफान मुजावर सोशल मीडियावर तुफान व्हायरल ;ठरला हिरो

### संकटात धर्म नाही तर...माणुसकीच कामाला येते

**सोलापूर/महेश गायकवाड:–**

खुदा का बंदा इरफान माणुसकीची खरी जात ठरला आहे. संकटात धर्म नाही तर...माणुसकीच कामाला येते हे इरफान मुजावर यांनी दाखवून दिले आहे.

अपघातात पाच लोकांना वाचवणारा इरफान मुजावर सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत हिरो ठरला आहे तांदुळवाडी येथे झालेल्या पिक अप गाडी च्या अपघातातील पाच जणांना इरफान मुजावर यांनी वाचविले होते यात दोन लहान बालके आणि तीन महिला यांचा समावेश आहे.

हिंदू-मुस्लिम द्वेषाच्या गोंगाटात एक इरफान मुजावर शांतपणे माणुसकीचा अर्थ शिकवून गेला. सोलापूरच्या तांदूळवाडी येथे भाविकांचा पिकअप विहिरीत कोसळला. आठ जणांचा मृत्यू झाला; पण त्याच वेळी दुचाकीवरून येणाऱ्या इरफानने क्षणाचाही विचार न करता मदतीला धाव घेतली. बाळ बुडताना दिसताच त्याने थेट विहिरीत उडी मारली आणि ग्रामस्थांच्या मदतीने पाच जणांचे जीव वाचवले. त्या क्षणी त्याने नाव विचारले नाही, जात पाहिली नाही, धर्म पाहिला नाही. त्याने फक्त जीव पाहिला. आणि जिथे समाजात काही लोक माणसांना धर्माच्या नावाने तोडतात, तिथे इरफानने पाण्यात उतरून माणुसकीला वर काढले.

खरा धर्म तोच, जो संकटात हात देतो.
खरी भक्ती तीच, जी जीव वाचवते.
खरा देवदूत तोच, जो विचार न करता धावून जातो.

#### इरफान मुजावर माणसाला देव

सोडलं मीडियावर फक्त इरफान मुजावर यांच्या कामगिरीच्या पोस्ट फिरत आहेत इरफान मुजावर यांचे फोटो आणि त्यांच्या अभिनंदनाचे मेसेज आणि त्यांच्या कौतुकाचे फोटो सर्वत्रच सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

#### सोशल मीडियावर इरफान मुजावर यांचे मोठ्या प्रमाणात कौतुक आणि अभिनंदन

सोलापूर जिल्ह्यातील सोशल मीडियावर सध्या इरफान मुजावर हिरो ठरला आहे. सोलापूर जिल्ह्यातील सर्वच मीडियावर सोशल मीडिया प्रिंट मीडिया आऊट डोअर मीडिया ऑनलाइन मीडिया डेस्क मिडिया वर सध्या इरफान मुजावर यांच्या धाडसाचे आणि त्यांच्या केलेल्या मदतीचे फोटो झळकत असून त्याचे सर्वत्र नाव होत असून त्यांचे मोठ्या प्रमाणात कौतुक करून त्यांना धन्यवाद दिले जात आहेत. व त्यांचे अभिनंदन केले जात आहे

#### लक्षात ठेवा...

मंदिरात देव दिसतो, मशिदीत अल्लाह दिसतो...
पण संकटात धावून येणाऱ्या माणसातच खरा देव असतो!
खरंच अशा माणसांची संकटात मदत करणाऱ्या लोकांची समाजाला गरज असते असेही संदेश सोशल मीडियावर व्यक्त होत आहेत.





इरफान मुजावर ही फक्त एका अपघातातील धाडसी व्यक्तीची गोष्ट नाही; ही महाराष्ट्राला आठवण करून देणारी घटना आहे की माणसाची जात माणूसच असते. अशा या माणुसकीच्या देवाला आपण सगळेच सलाम करू यात.

काल झालेल्या अपघाताच्या काळ्याकुट्ट क्षणी नाव आशेचा किरण बनून पुढे आले - इरफान मुजावर! हा व्यक्ती तेथील स्थानिक नागरिक आहे. त्यांने आपल्या डोळ्यासमोर होत असलेला अपघात बघून स्वतःच्या जीवाची पर्वा न करता थेट विहिरीत उडी घेतली. कोण आहे, कोणत्या धर्माचा आहे, कोणत्या जातीचा आहे, याचा विचार न करता त्यांनी फक्त एकच गोष्ट पाहिली - मदतीसाठी तडफडणारे जीव! मृतांच्या कुटुंबांसाठी इरफान मुजावर साक्षात देवदूतच ठरला !

आज समाजात धर्म, जात, पंथ यांच्या नावावर भिंती उभ्या केल्या जातात. पण संकटाच्या क्षणी माणुसकीच सर्वात मोठी ओळख असते, हे इरफान मुजावर यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे.



मौलाना अबुल कलाम आझाद नगरपरिषद उर्दू सेमी इंग्लिश शाळा क्र. ८ शाळेत

# विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश व गुलाबपुष्प देऊन स्वागत

**विटा/ प्रतिनिधी:–**

दि. १५ जून २०२६ रोजी मौलाना अबुल कलाम आझाद नगरपरिषद उर्दू सेमी इंग्लिश शाळा क्रमांक आठ विटा च्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम घेऊन दखल पात्र मुलांना व इतर सर्व मुलांना पाठ्यपुस्तके गणवेश व गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

सदर कार्यक्रमास विटा नगरपरिषद विटाचे नगरसेवक संजय भिंगारदेवे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रहिमानभाई शिकलगार, सदस्य आरिफ कोकणे, लाडलेमशाक सुतार, अमोल सावंत तसेच महिला सदस्या उपस्थित होत्या.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांचे शाळेचे मुख्याध्यापक बागशिराज सर यांचे हस्ते गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे स्वागत पाठ्यपुस्तके, गणवेश व गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. तसेच इयत्ता पहिलीमध्ये दखलपात्र विद्यार्थ्याकरिता शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम साजरा करण्यात आला. शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवर व पालकांचे आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सदर कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक व पालक वर्ग उपस्थित होते.

# शहरात कोयता नाचवून दहशत; तिघांविरुद्ध गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:–**

राजवाडा स्टँड ते मंगळवार तळे मार्गावर भररस्त्यात कोयत्यासारखे धारदार शस्त्र फिरवत दहशत माजवणाऱ्या तिघांविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संजय सहाने, अनिल चव्हाण आणि एका अल्पवयीन मुलाने आरडाओरडा करत कोयते फिरवल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तातडीने कारवाई करत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# सांगली जिल्ह्यात घरसूची व घरगणना टप्प्याचे १०० टक्के काम पूर्ण

## निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे

**सांगली/प्रतिनिधी:–**

आगामी जनगणना २०२७ अंतर्गत पहिल्या टप्प्यातील घरसूची व घरगणना कार्य सांगली जिल्ह्यात यशस्वीरित्या १०० टक्के पूर्ण झाले आहे. जिल्हाधिकारी तथा प्रधान जिल्हा जनगणना अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील चार्ज अधिकारी म्हणजेच सर्व तहसीलदार व मुख्याधिकारी यांनी ही कामगिरी यशस्वी केली आहे. जिल्ह्यातील सर्व ३,९५७ घरसूची गटांचे (व्हइ) काम १२ जून २०२६ अखेर शंभर टक्के पूर्ण झाल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी डॉ. स्नेहल कनिचे यांनी दिली.

जनगणना २०२७ ही दोन टप्प्यांत राबविण्यात येत असून, पहिल्या टप्प्यात घरसूची व घरगणना करण्यात आली. १६ मे २०२६ पासून प्रगणकांनी त्यांना नेमून दिलेल्या भागांमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन घरगणनेचे काम केले. घरगणना करत असताना शासनाने ठरवून दिलेले ३४ प्रश्न घरातील प्रमुख अथवा उपस्थित व्यक्तिंना विचारून सदरची माहिती एचएलओ मोबाईल पव्दारे जनगणना पोर्टलवर अपलोड करण्यात आली. हे काम ४,४७२ प्रगणक आणि ८०६ पर्यवेक्षक यांच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील एकूण ३,९५७ घरसूची गटांपैकी सर्व ३,९५७ गटांचे काम पूर्ण झाल्याने जनगणना २०२७ चा पहिला टप्पा सांगली जिल्ह्यात यशस्वीपणे पूर्ण करण्यात आला आहे. चार्जनिहाय पूर्ण झालेले एकूण घरयादी गट पुढीलप्रमाणे. शिराळा (२६३), वाळवा (५६५), पलूस (२११), कडेगाव (२२५), खानापूर (विटा) (२१५), आटपाडी (२२३), तासगाव (३३४), मिरज (५२९), कवठेमहांकाळ (२२८),जत (५१५), शिराळा नगरपंचायत (३५), उरूण-ईश्वरपूर नगरपरिषद (१५६), आष्टा नगरपरिषद (५८), पलूस नगरपालिका (५६), कडेगाव नगरपंचायत (२६), खानापूर नगरपंचायत (१७), विटा नगरपरिषद (१०१), आटपाडी नगरपंचायत (३६), तासगाव नगरपरिषद (८३), कवठेमहांकाळ नगरपंचायत (३७) व जत नगरपरिषद (४४).

# पेंटचा डबा बदलून न दिल्याने व्यावसायिकास मारहाण

**सातारा/प्रतिनिधी:–**

पेंटचा डबा बदलून न दिल्याच्या किरकोळ कारणावरून तीन जणांनी दुकानमालकास लोखंडी रॉड व दांडक्याने मारहाण केल्याची घटना देगाव फाटा परिसरात घडली. रेहाण अझरुद्दीन मणेर यांच्या फिर्यादीनुसार राजेंद्र साळुंखे व त्यांच्या दोन्ही मुलांनी दुकानात घुसून मारहाण केली. भांडण सोडविण्यासाठी आलेल्या हारुण शेख, मुक्तार अन्सारी व अत्तार यांनाही मारहाण करण्यात आली. सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून तपास सुरू आहे.

# ‘टिळक’मध्ये कार्याध्यक्षपदी वैभव सावंत यांची निवड

**कराड/प्रतिनिधी : –**

टिळक हायस्कूल, कराडमध्ये शैक्षणिक वर्षात होणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी कार्याध्यक्षपदी अध्यापक वैभव रामचंद्र सावंत यांची निवड करण्यात आली. उपकार्याध्यक्षपदी अध्यापक प्रकाश साहेबराव मोरे व सेवक अशोक रामलिंग वडगणे यांची एकमताने निवड करण्यात आली.

शैक्षणिक वर्षातील विविध कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी करण्याचे कर्तव्य कार्याध्यक्ष व उपकार्याध्यक्षांना पार पाडावे लागते. निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन टिळक हायस्कूलचे मुख्याध्यापक शरद शिंदे,उपमुख्याध्यापक पंडित मोरे,पर्यवेक्षिका वैशाली भोपळी,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.



# ढोल-ताशांच्या गजरात नवागतांचे जल्लोषी स्वागत

## महाराष्ट्र हायस्कूल व शिवाजी प्राथमिक विद्यालयात शैक्षणिक वर्षाचा उत्साहपूर्ण प्रारंभ, वही, पुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वाटप

**कराड/प्रतिनिधी : –**

उन्हाळी सुट्टीनंतर नव्या शैक्षणिक वर्षाला सोमवारी उत्साहपूर्ण सुरुवात झाली. श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट संचलित महाराष्ट्र हायस्कूल, कराड आणि श्री शिवाजी विद्यालय प्राथमिक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात आणि आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील उत्साह आणि शाळा परिसरातील मंगलमय वातावरणामुळे शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी आनंदाचे चित्र पाहायला मिळाले.

या स्वागत समारंभासाठी संस्थेचे ज्येष्ठ संचालक ड. सतीश पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक दीपक लादे होते. तसेच श्री शिवाजी विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका सौ. एस. ए. पवार आणि प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक एस. टी. सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर विद्यार्थ्यांना वह्या, पेन आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना ड. सतीश पाटील यांनी, विद्यार्थ्यांना नियमितपणे शाळेत उपस्थित राहून मनापासून शिक्षण घेण्याचे आवाहन केले. शिक्षण हेच यशस्वी भवितव्याचे भक्कम साधन असून कोणतीही प्रतिकूल परिस्थिती प्रगतीच्या आड येऊ शकत नाही, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर उच्च पदांपर्यंत पोहोचण्याचा संदेश दिला. तसेच शाळा, पालक आणि स्वतःचे नाव उज्ज्वल करण्यासाठी शालेय जीवनातच चांगल्या सवयी व अभ्यासाची शिस्त अंगीकारण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन. जे. खाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शशिकांत शिंदे यांनी मानले.

या प्रसंगी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवागत विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण स्वागताने शाळेच्या नव्या शैक्षणिक वर्षाची संस्मरणीय सुरुवात झाली.



# रेखा सोनकवडे यांच्या नियोजनात खैराट शाळेत प्रवेश उत्सव आणि शाळापूर्व मेळावा जल्लोषात साजरा

**अक्कलकोट/प्रतिनिधी:–**

जि .प .प्राथमिक मराठी शाळा खैराट ता .अक्कलकोट या शाळेत विद्यार्थी प्रवेश उत्सव व शाळा पूर्व मेळावा घेण्यात आला .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष कविता जमादार होत्या .प्रथम इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची मोटरसायकलवर मिरवणूक काढण्यात आली..गुलाब फुलं फुगे टोपी व चॉकलेट देऊन फेरी काढण्यात आली .तद्नंतर शाळेत सर्व विद्यार्थ्यांना कुंकू लाऊन गुलाब फुले देऊन औक्षण करण्यात आले .केंद्रप्रमुख यांनी सर्व उपस्थित पालकांचे पुष्प देऊन स्वागत केले. .नवीन प्रवेश घेतलेले विद्यार्थी व पालक यांचे स्वागत सुनील होनाजे यांनी केले .पाठ्यपुस्तक व गणवेश वाटप श्रीहरी करपे व मान्यवरांच्या हस्ते झाले .रेखा सोनकवडे यांनी पालकांना मार्गदर्शन केले.जिल्हा परिषद शाळा ही सगळ्यात चांगली आहे .इथे शिकलेला विद्यार्थी कुठेही कमी पडत नाही .आपल्याला आपल्या भाषेतून शिक्षण सोपं जात .सर्वगुणसंपन्न व्हायच असेल तर जिल्हा परिषद शाळा शिकवा .मुलांच्या आरोग्याकडे लक्ष दया .रोज शाळेत पाठवा .आपल्या जिल्हा परिषद शाळेत आपल्या पाल्याचे नाव नोंदवा .असे आवाहन त्यांनी केले.

बाळूसिंग .राजपुत यांनी पालकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .याप्रसंगी सज्जादे सलाम श्रीकांत गायकवाड बसवराज नरूने शोएबअली बिराजदार हिना बिराजदार जाहेदाबी बिराजदार लक्ष्मी बिराजदार कविता जमादार शशीकला तोळनुरे मैमूना बिराजदार इत्यादी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते .सर्व विद्यार्थ्यांना गोडजेवण जिलेबी देण्यात आली .फिरोजा नदाफ यांनी आभार मानले .



# जि.प.प्राथमिक मराठी शाळा, घोळसगाव येथे प्रवेशोत्सव व नवागतांचे उत्साहात स्वागत



**अक्कलकोट/प्रतिनिधी:–**

आज दिनांक १५ जून २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, घोळसगाव या ठिकाणी इयत्ता पहिली मध्ये नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी आजच्या या कार्यक्रमानिमित्त गावामध्ये सकाळी आठ वाजता प्रभात फेरी काढून शिक्षणाविषयी जनजागृती करण्याचा प्रभावी प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर इयत्ता पहिली मध्ये दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रांगणामध्ये गावातील सर्व शिक्षणप्रेमी व नागरिकांच्या उपस्थितीमध्ये औक्षण करून स्वागत करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे उमटवून त्या पावलांच्या ठशांची प्रत पालकांना प्रदान करण्यात आले.

आजच्या या प्रवेश उत्सवाच्या व नवागतांच्या स्वागताच्या कार्यक्रमासाठी अक्कलकोट पंचायत समितीचे सदस्य अप्पासाहेब किवडे तसेच घोळसगाव चे ग्रामसेवक आर जी चव्हाण साहेब, नरसिंग कोलाटी, आरिफ दिवटे, ईश्वर किवडे, रुद्राप्पा किवडे, महेश त्रिकुळे, विश्वनाथ किवडे, महेश हापाळे, दरिप्पा हडपद,, ज्ञानेश्वर पाटील, जगन्नाथ सुतार, चनबसप्पा आलोरे आयुब मकानदार मुल्ला, सौ अंजुम अष्टेकर व गुंडेराव जगताप उपस्थित होते.

आजच्या या प्रवेश उत्सवाच्या कार्यक्रमानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना नरसिंग कोलाटी यांनी जिलेबी वाटप केले व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामेश्वर पाटील यांनी इयत्ता पहिली मध्ये नव्याने दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना नवीन बॅगा दिल्या व गावातील शिक्षणप्रेमी, श्री महेश त्रिकुळे यांनी इयत्ता पहिलीच्या नवागतांसाठी वही आणि पेन्सिल चे वाटप केले, आजच्या या कार्यक्रमांमध्ये पट नोंदणी मध्ये उल्लेखनीय कार्य करणारे शिक्षक रामेश्वर दरेकर व मनोज माने यांचा सत्कार करण्यात आला. आजच्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित ठाकर यांनी केले व या कार्यक्रमावेळी शाळेतील शिक्षक अमोल गुंजोटी, मुरलीधर वागदकर यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमावेळी घोळसगाव मधील नागरिक व शिक्षण प्रेमी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते एकंदरीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# खेराडे वांगी येथे जि.प.शाळेत ‘शाळा प्रवेशोत्सव’ उत्साहात संपन्न

## मिकी माऊसचे आकर्षण आणि पालकांचा कृतज्ञता सन्मान

**कडेगाव/प्रतिनिधी:–**

तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा खेराडे वांगी येथे नवीन शैक्षणिक वर्षाचे स्वागत अत्यंत आनंदी आणि उत्साही वातावरणात ‘शाळा प्रवेशोत्सव’ म्हणून करण्यात आले. पहिल्याच दिवशी नवोदित विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात वाजत-गाजत स्वागत करण्यात आले. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरला तो मुलांचा आवडता ‘मिकी माऊस’. मिकी माऊसच्या मजेशीर उपस्थितीने लहान मुलांमधील शाळेची भीती दूर होऊन त्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद पाहायला मिळाला. या कार्यक्रमाला खेराडे वांगीचे सरपंच अनिल सूर्यवंशी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पुरुषोत्तम सूर्यवंशी, समितीचे सदस्य राहुल माने, शरद सूर्यवंशी व शांता सूर्यवंशी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी उपस्थित माता व पालकांचे स्वागत करून शाळेच्या वतीने त्यांना ‘कृतज्ञता सन्मानपत्र’ वाटप करण्यात आले. तत्पूर्वी या सन्मानपत्राचे जाहीर वाचन करण्यात आले, ज्याला पालकांनी उत्स्फूर्त दाद दिली.विद्यार्थ्यांच्या पहिल्या दिवसाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी गावातील दानशूर व्यक्तींनी मदतीचा हात पुढे केला. यामध्ये प्रकाश सूर्यवंशी, विकास सूर्यवंशी आणि द्रौपदा सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना मोफत वह्या व लेखन साहित्याचे पुरवठा केला, तर विजय विलास सूर्यवंशी यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. तसेच पहिल्या दिवशी शाळेच्या वतीने सर्व उपस्थितांना गोड शिरा आणि व्हेज बिर्याणीचे भोजन देण्यात आले. हा सोहळा वरिष्ठ मुख्याध्यापक नितांत तांबडे यांच्या मार्गदर्शनाखाली विलासराव आपटे, प्रदीप साळुंखे, लता साळुंखे आणि प्रवीण गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेऊन यशस्वी केला. या कार्यक्रमासाठी स्थानिक अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी मोलाचे सहकार्य केले.



# गुण हे यशाचे एक मापदंड, व्यक्तिमत्त्व विकास हीच खरी यशाची गुरुकिल्ली: प्रवीण बागडे

**नागपूर/प्रतिनिधी:–**

अखिल भारतीय सर्वधर्म समाज पार्टीच्या वतीने दहावी व बारावी परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार व शैक्षणिक मार्गदर्शन कार्यक्रम रविवारी गृहनिर्माण सोसायटी, बजरंग नगर येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, पालक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अब्दुल वहीद पटेल होते. प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून डॉ. अब्दुल बारी व कवी तन्हा नागपुरी उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून प्रशासकीय अधिकारी व सामाजिक विचारवंत प्रवीण बागडे, ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर सोमकुवर तसेच आयु. अशोककुमार डोहारे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रवीण बागडे म्हणाले की, गुण हे यशाचे एक मापदंड असले तरी व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि सातत्यपूर्ण ज्ञानार्जन हीच खरी यशाची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी जिद्द, परिश्रम आणि सकारात्मक दृष्टिकोन जोपासावा, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. अब्दुल बारी यांनी सर्वधर्म समभाव, सामाजिक सलोखा आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांच्या यशामागील पालक व शिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या यशोगाथा मांडल्या. उपस्थित पालकांनी अशा प्रेरणादायी उपक्रमांचे स्वागत करत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली. याप्रसंगी व्यासपीठावर महिपाल मेश्राम, किरण गायकवाड, बबला पाटील, भरत पानतावणे, विनील चौरासिया व चंद्रभान चकोले प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आयोजकांनी केले. विद्यार्थ्यांचा उत्साह आणि मान्यवरांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे कार्यक्रम संस्मरणीय ठरला.




सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.

**नशिबाची परीक्षा**
मंगळवार दि. १६ जून २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त — सिंगल ५-६-८ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 140 230 780 | 5 - 4 | 158 248 220 | 59-74-16-80-43 |

**कल्याणम**
उदय-अस्त — सिंगल २-७-० मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 129 480 228 | 2 - 9 | 126 450 117 | 21-89-03-75-96 |

**मुंबैम ( मेन )**
उदय-अस्त — सिंगल ९-१-२ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 270 289 225 | 9 - 5 | 140 230 780 | 90-45-13-26-57 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

# आज का अंदाज

**मंगळवार दिनांक १६ जून २०२६**

| कल्याण बाजार ‘पत्थर फोड एकच’ | मुंबई बाजार ‘पत्थर फोड एकच’ |
|---|---|
| ० - १ - ४ - ७ | ३ - ५ - ६ - ९ |
| ४७९-४७०-६८०-२६९ | १५७-१६८-१२३-१२६ |
| ३८९-५६०-७८९-४५८ | ४९०-३४८-२५९-२८९ |
| २८०-३८०-५९०-३४० | ५८०-७८०-४५७-४५० |
| जोडी | जोडी |
| ०२ - १२ - ४३ - ७३ | ३१ - ६१ - ५२ - ९७ |
| ०५ - १५ - ४६ - ७६ | ३० - ६७ - ५१ - ९८ |
| ०८ - १८ - ४९ - ७९ | ३८ - ६० - ५० - ९१ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि. १६-१७ जून
प्रो.रामकुमार मो.नं. ९८२२४८६०३४

**मंगळवार दिनांक १६ जून २०२६**

सर्व बाजार साठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ६३ | ९३ |
| २४ | ५४ | ६० | ९० |
| २८ | ५८ | ६७ | ९७ |
| १२९ | १५९ | १७९ | २३५ |
| ५८९ | २६७ | ३५९ | ४७९ |
| ६६० | ७८० | ८९० | ३८९ |

प्रो.रामकुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर विजय मिळवू

## सौ.अर्चनाताई मोहिते ;वडगाव हवेलीत जाहीर सभा,सत्ताधाऱ्यांवर मातब्बरांची मदत घेण्याची वेळ-जगताप

**कराड/प्रतिनिधी : –**

कृष्णा कारखान्याचा विकास आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी संस्थापक पॅनेल ठोस भूमिका मांडत आहे; मात्र सत्ताधारी केवळ वैयक्तिक टीका करण्यात व्यस्त आहेत. अनेक मातब्बरांनी सत्ताधाऱ्यांसमोर गुडघे टेकले, पण अविनाश मोहिते आजही तत्त्वांवर ठाम राहून लढा देत आहेत. विरोधकांकडून सभांतील गर्दीवरून आव्हाने दिली जात असली, तरी छत्रपती शिवाजी महाराजांनी मोजक्या मावळ्यांच्या जोरावर साम्राज्य उभे केले होते. त्याच जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आम्हीही ही निवडणूक जिंकून दाखवू, असा ठाम विश्वास कृषीमहर्षी आबासाहेब मोहिते संस्थापक पॅनलच्या नेत्या सौ. अर्चनाताई मोहिते यांनी व्यक्त केला.

यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वडगाव हवेली (ता. कराड) येथे संस्थापक पॅनेलच्या जाहीर प्रचारसभेत त्या बोलत होत्या. यावेळी पॅनलचे नेते, कारखान्याचे माजी चेअरमन अविनाश मोहिते, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नामदेव पाटील, बंडानाना जगताप, अजितराव पाटील-चिखलीकर, उमेदवार प्रताप जगताप यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना कारखान्याचे माजी चेअरमन अविनाश मोहिते म्हणाले, कृष्णा कारखान्याच्या सभासदांना आंतरराष्ट्रीय दर्जाची साखर देणार असल्याचे आमदार जाहीर भाषणांतून सांगत आहेत. मात्र साखर ही जगभरात सारखीच असते. मतचोरी करून निवडून आलेले आमदार काय बोलत आहेत, याचेही भान त्यांना राहिलेले नाही. माजी मुख्यमंत्र्यांचा झालेला पराभव जनतेला आजही मान्य नाही. कृष्णा कारखान्यासारख्या मातृसंस्थेच्या जीवावर राजकारण करणाऱ्या लोकांना आता पुन्हा सभासदांकडे मते मागताना काही वाटत नाही, अशी घणाघाती टीका त्यांनी सत्ताधाऱ्यांवर केली.

ते म्हणाले, कारखान्याची पारितोषिके काय चाटायची आहेत? त्यापेक्षा सभासदांच्या हिताचे बोला. त्यांनी उच्चांकी दर कधीच दिला नाही, आम्ही ३४१ कोटी रुपये एफआरपीपेक्षा जास्त दर दिला. त्यांनी १० हजार मयत सभासदांच्या वारसांच्या नावे शेअर्स हस्तांतरित केले नाहीत. आम्ही ते तीन महिन्याच्या आत करून दाखवू, त्यांनी पाच टनांमध्ये पाणीपट्टी कापली, आम्ही ७५०० रुपये करू, त्यांनी बसवलेली बैठी पाणीपट्टी बंद करून, पिठ्ठी साखरेऐवजी दर्जेदार १२० किलो साखर विनामूल्य घरपोच देऊ, अशी ग्वाही त्यांनी दिली.

बंडानाना जगताप म्हणाले, अविनाश मोहिते आणि अर्चनाताई मोहिते यांना मिळणारा वाढता प्रतिसाद पाहून चेअरमन आणि आमदारांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यामुळेच विश्वजीत कदम, उदयसिंह पाटील आणि इंद्रजीत मोहिते यांच्याकडे मदतीसाठी धाव घेण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

अजितराव पाटील-चिखलीकर यांनी, पाणीप्रश्नावरून आमदारांना लक्ष्य केले. केंद्राच्या निधीतून पाणी योजना आणण्याच्या घोषणा केल्या जात असताना नांदगाव आणि मनव परिसरातील ऊस पाण्याअभावी जळत आहे. त्या शेतकऱ्यांसाठी आतापर्यंत काय केले, याचे आधी उत्तर द्या.

रात्रंदिवस कष्ट करून शेतकरी ऊस पिकवतो आणि त्याच पैशातून संसार उभा करतो, मुलांचे भविष्य घडवतो, अशा शेतकऱ्यांच्या पाण्यावर राजकारण करणे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी सभासदांना कोणत्याही अमिषाला बळी न पडता स्वाभिमानाने मतदान करण्याचे आवाहन केले.

ऊस वाहतूक संघटनेचे अध्यक्ष गजानन पाटील यांनी, कारखान्याच्या आर्थिक व्यवहारांबाबत दिशाभूल केल्याचा आरोप सत्ताधाऱ्यांवर केला. ऊस वाहतूकदारांच्या कर्जप्रकरणी चुकीची माहिती पसरवण्यात आली. प्रत्यक्षात शिल्लक असलेली ५७ कोटी रुपयांची रक्कम बँक ऑफ इंडियामध्ये जमा असतानाही अविनाश मोहिते यांची बदनामी करण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी भिमराव खबाले, सतीश जगताप, राजेंद्र पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार उमेदवार प्रताप जगताप यांनी मानले. सभेस राहुल पवार, धनाजी शिंदे, प्रमोद साळुंखे, शिवाजीराव मोहिते, आनंदराव जगताप, बापुराव पाटील, उत्तमराव जाधव यांच्यासह परिसरातील शेतकरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### आम्ही काही आटपाडीहून आलेलो नाही!

कारखाना खासगी झाल्यास सभासदांचा आधारच संपुष्टात येईल. पूर्वी कारखान्यात सभासदांच्या मुलांनाच रोजगाराच्या संधी मिळत होत्या; मात्र आज बिहारी कामगार मोठ्या पगारावर काम करत आहेत. शेतकऱ्यांच्या मुलांशी अरेरावीची भाषा केली जाते, त्यांना धमकावले जाते. चेअरमन लोकांमध्ये येत नाहीत, सभासदांच्या अडीअडचणी ऐकत नाहीत. मग अशा लोकांना पुन्हा निवडून का द्यायचे? आम्ही काही आटपाडीहून आलेलो नाही. आम्हीही या मातीत जन्मलेले भूमिपुत्र आहोत. सभासदांना धमकावून किंवा दबाव टाकून कोणीही गप्प बसणार नाही; हे लक्षात ठेवा, अशा शब्दांत अविनाश मोहिते यांनी सत्ताधाऱ्यांना थेट इशारा दिला.

# एसटी कर्मचाऱ्यांचा सरकारविरोधात घंटानाद

## प्रलंबित मागण्यांसाठी महाआरती आंदोलन

**सातारा/प्रतिनिधी:–**

प्रलंबित वेतनवाढ, महागाई भत्त्याची थकबाकी आणि इतर आर्थिक मागण्यांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र एसटी संयुक्त कृती समितीच्या वतीने सोमवारी सातारा विभागासह जिल्ह्यातील सर्व आगारांमध्ये घंटानाद व महाआरती आंदोलन करण्यात आले. राज्यभरातील विविध एसटी युनिटमध्येही हे आंदोलन एकाचवेळी पार पडले.

सकाळी अकरा वाजता शेकडो एसटी कर्मचाऱ्यांनी एकत्र येत घंटानाद केला. त्यानंतर सरकारने एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी, या मागणीसाठी महाआरती करण्यात आली. आंदोलनानंतर सातारा विभाग नियंत्रक ज्योती गायकवाड यांना निवेदनाची प्रत देण्यात आली. तसेच जिल्हाधिकारी संतोष चंद्रकांत पाटील यांच्यामार्फत राज्य शासनाकडे मागण्यांचे निवेदन पाठविण्यात आले.

यावेळी कर्मचाऱ्यांनी एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करावी, कॅशलेस मेडिक्लेम सुविधा उपलब्ध करून द्यावी, २०१६ पासून कमी करण्यात आलेला वेतनवाढीचा दर पुन्हा ३ टक्के करावा, घरभाडे भत्ता वाढवून त्याची थकबाकी अदा करावी तसेच महागाई भत्त्याची थकीत रक्कम तत्काळ द्यावी, अशा प्रमुख मागण्या केल्या.

बसस्थानक परिसरात 'कामगार एकजुटीचा विजय असो' आणि 'आमच्या मागण्या मान्य करा' अशा घोषणांनी वातावरण दणाणून गेले. सरकारने वेळेत निर्णय न घेतल्यास आंदोलनाची तीव्रता वाढविण्यात येईल, असा इशारा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

दरम्यान, २२ जून रोजी प्रचंड द्वारसभा आयोजित करण्यात येणार असून २९ जूनपासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्याचा निर्णय समितीने जाहीर केला आहे. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# वडोली (भिकेश्वर) गावच्या हद्दीत कारचा भीषण अपघात

## एकाचा मृत्यू तर एक गंभीर जखमी

**चरेगाव/प्रतिनिधी : –**

वडोली भिकेश्वर, ता. कराड गावच्या हद्दीत कारला झालेल्या अपघातात एकाचा जागीच मृत्यू तर एक गंभीर जखमी झाल्याची घटना रविवारी पहाटे घडली. कोरेगाव तालुक्यातील एका कंपनीत काम करणारे तीन मित्र सुट्टीसाठी गणपतीपुळे येथे फिरण्यासाठी निघाले असताना त्यांच्या चारचाकी गाडीचा मध्यरात्री भीषण अपघात झाला. भरधाव वेगातील ही कार २ ते ३ वेळा पलटी होऊन रस्त्यालगतच्या झाडीत जाऊन अडकली.

सुनिल ओंकार खंडागळे (वय २३), सध्या रा. पाटण (मूळ रा. बीड जिल्हा) यांचा जागीच मृत्यू झाला. तर प्रतीक धावणे (वय २८) मूळ चंद्रपूर जिल्हा हा गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. हरीश सुरेश वाघमारे वय २८ हा तिसरा युवक किरकोळ जखमी झाला असून तो सातारा जिल्ह्यातील पडळ येथील रहिवासी आहे. दरम्यान, मसूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पुढील तपास सुरू केला आहे. वडोली गावचे पोलिस पाटील राजू रामुगडे यांनी पोलिसांना माहिती देत स्थानिकांच्या मदतीने जखमींना उपचारासाठी कराडला हलवले आहे. याठिकाणी पोलिस पाटील राजू रामुगडे, पीएसआय सुधाकर भोसले,पोलिस कॉन्स्टेबल कोळेकर यांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले.



# सातारा जिल्ह्यात उत्साहात नवागतांचे स्वागत

## पहिल्याच दिवशी शाळा गजबजल्या!

**सातारा/प्रतिनिधी:–**

दीर्घ सुट्टीनंतर आजपासून सातारा जिल्ह्यातील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांची घंटा वाजली. पहिल्याच दिवशी शाळांमध्ये प्रवेश करणाऱ्या नवागत विद्यार्थ्यांचे (पहिलीचे विद्यार्थी) आणि इतर वर्गांतील मुलांचे ढोल-ताशांच्या गजर, फुलांची उधळण आणि आकर्षक रांगोळ्या, मिरवणुका काढून अत्यंत उत्साही वातावरणात स्वागत करण्यात आले. पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके हातात पडल्याने चिमुरड्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता.

जिल्हा परिषद आणि खाजगी शाळांमध्ये सकाळपासूनच स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली होती. अनेक शाळांच्या मुख्य प्रवेशद्वारावर फुलांची कमानी आणि आकर्षक सुलेखन करून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. काही शाळांमध्ये तर चक्क ढोल-ताशांच्या गजरात आणि लेझीमच्या तालावर प्रभातफेरी काढण्यात आली. वर्गात प्रवेश करताना शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प, चॉकलेट आणि शैक्षणिक साहित्य देऊन त्यांचे 'गृहप्रवेशा'सारखे स्वागत केले.



दरवर्षीप्रमाणे यंदाही पहिलीच्या वर्गात प्रवेश करणाऱ्या काही चिमुरड्यांच्या चेहऱ्यावर आई-बाबांपासून दूर होण्याचा संकोच आणि डोळ्यात अश्रू पाहायला मिळाले. मात्र, शिक्षकांनी मायेने जवळ घेत, गाणी गात आणि खेळ खेळवत काही वेळातच या नवख्या मुलांना रमवून घेतले. रंगीबेरंगी फुगे आणि सुशोभित केलेले वर्ग पाहून मुलांचे रडू थांबले आणि वर्गात हसू फुलले.

शिक्षण विभागाच्या नियोजनानुसार, शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत मिळणारी पाठ्यपुस्तके वितरित करण्यात आली. नवीन पुस्तकांचा सुवास आणि त्यावरील रंगीबेरंगी चित्रे पाहण्यात मुले दंग झाली होती. अनेक शाळांमध्ये लोकसहभागातून विद्यार्थ्यांना वह्या, दप्तरे आणि वॉटर बॅगचेही वाटप करण्यात आले.केवळ शिक्षक आणि विद्यार्थीच नव्हे, तर गावागावांतील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि पालकांनी शाळांमध्ये मोठी गर्दी केली होती. अनेक गावांमध्ये पहिल्या दिवशी शालेय पोषण आहारांतर्गत विद्यार्थ्यांना गोड जेवण (सुखडी किंवा लाडू) देण्यात आले.

सुट्ट्यांच्या शांततेनंतर आज सातारा जिल्ह्यातील शाळा पुन्हा एकदा मुलांच्या किलबिलाटाने गजबजल्या असून, नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात अत्यंत सकारात्मक वातावरणात झाली आहे.

> शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असतो. मुलांच्या मनात शाळेबद्दल भीतीऐवजी आपुलकी निर्माण व्हावी, यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये 'प्रवेशोत्सव' साजरा करण्याच्या सूचना दिल्या होत्या. शिक्षकांनी आणि ग्रामस्थांनी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे.
>
> - अनिस नायकवडी
>
> शिक्षणाधिकारी,प्राथमिक जिल्हा परिषद सातारा)

# रेल्वे हद्दीतील रखडलेल्या विकासकामांना मिळणार वेग

## आ. घोरपडे यांची रेल्वे अधिकाऱ्यांसोबत बैठक;गैरसोयी दूर करण्यासाठी समन्वयावर भर

**कराड/प्रतिनिधी : –**

कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातील रेल्वे हद्दीतील विविध प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी आमदार मनोज घोरपडे यांनी रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली. रेल्वे विभागाचे बांधकाम प्रमुख माधव जाधव यांच्याशी झालेल्या चर्चेत मतदारसंघातील महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांसह इतर विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



मतदारसंघातील अनेक भाग रेल्वे हद्दीत येत असल्याने विविध विकासकामांसाठी रेल्वे प्रशासनाच्या परवानग्या आवश्यक ठरतात. रेल्वे मार्गांच्या विस्तारीकरणामुळे काही ठिकाणी नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत असून, त्यामुळे अनेक कामे रखडल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या अडचणी दूर करून विकासकामे तातडीने मार्गी लावावीत, अशा सूचना आमदार घोरपडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

बैठकीत नेहरवाडी-रहीमतपूर रस्ता, टकले रस्ता तसेच तारगाव-वाठार मार्ग या महत्त्वाच्या प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. दळणवळणाच्या दृष्टीने या मार्गांचे महत्त्व लक्षात घेऊन संबंधित कामे निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

याशिवाय रेल्वे मार्गालगतची अन्य प्रलंबित विकासकामे, आवश्यक परवानग्या आणि प्रशासकीय समन्वय याबाबतही चर्चा झाली. मतदारसंघातील नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि विकासकामे वेळेत पूर्ण होण्यासाठी सर्व संबंधित विभागांमध्ये प्रभावी समन्वय ठेवला जाईल, असे आमदार मनोजदादा घोरपडे यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीनंतर रेल्वे हद्दीतील अनेक रखडलेल्या विकासकामांना चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचारप्रकरणी तरुणाविरुद्ध पोक्सो गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा शहर परिसरातील एका १७ वर्षीय मुलीवर अत्याचार केल्याच्या आरोपावरून एका युवकाविरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, पीडित मुलगी घरी एकटी असताना शेजारी राहणाऱ्या आरोपीने तिला कामाचे कारण सांगून स्वतःच्या घरी बोलावले. त्यानंतर तिच्यावर जबरदस्ती केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच ही बाब कोणाला सांगितल्यास परिणाम भोगावे लागतील, अशी धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. पीडितेच्या तक्रारीवरून अर्जुन भगवान पवार (वय २१, रा. समर्थ मंदिर परिसर, सातारा) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून महिला पोलीस उपनिरीक्षक भालेकर तपास करीत आहेत.

# माळेगाव पोलिसांची मोठी कारवाई

## २६ गुन्ह्यांतील सराईत आरोपीकडून दोन पिस्तुले, रायफल जप्त

**बारामती/ भारत तुपे:–**

माळेगाव पोलिसांनी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या सराईत आरोपीविरुद्ध मोठी कारवाई करत दोन गावठी पिस्तुले, एक रायफल आणि काडतुसांसह घातक शस्त्रसाठा जप्त केला आहे. विशेष म्हणजे, अटक करण्यात आलेल्या आरोपीविरुद्ध पुणे ग्रामीण, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये चोरी, जबरी चोरी तसेच शरीराविरुद्धच्या गुन्ह्यांसह एकूण २६ गुन्हे दाखल असल्याचे तपासातून निष्पन्न झाले आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सहाय्यक पोलीस निरीक्षक कुलदीप संकपाळ यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हे शोध पथकाने सांगवी परिसरात सापळा रचला. कार्तिक हॉटेल परिसरात संशयास्पदरीत्या बसलेल्या अक्षय कल्याण तावरे (वय ३५, रा. वाघवस्ती, सांगवी, ता. बारामती) याला ताब्यात घेण्यात आले. त्याची अंगझडती घेतली असता दोन गावठी पिस्तुले, दोन जिवंत काडतुसे आणि दोन वापरलेल्या काडतुसांच्या पोकळ्या आढळून आल्या.

प्राथमिक चौकशीनंतर पोलिसांनी आरोपीच्या घराची पंचांसमक्ष तपासणी केली. यावेळी घराशेजारील गोठ्यात ठेवलेल्या प्लास्टिकच्या ड्रममध्ये लपवून ठेवलेली रायफल जप्त करण्यात आली. आरोपीने चौकशीदरम्यान ही शस्त्रे सुमारे आठ महिन्यांपूर्वी मध्य प्रदेशातून आणल्याची कबुली दिली. तसेच शिरवली येथील निरा नदीपात्रात पिस्तुलांची चाचणी करण्यासाठी गोळीबार केल्याचेही उघडकीस आले आहे.

या प्रकरणी भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयाने आरोपीला १६ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून आरोपीकडून आणखी काही महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कुलदीप संकपाळ सहाय्यक, पोलीस उपनिरीक्षक डी. आर. साळवे, तुषार भोरे, पोलीस हवालदार विजय वाघमोडे, राहुल पांढरे तसेच पोलीस अंमलदार अमोल राऊत, ज्ञानेश्वर मोरे, अमोल कोकरे, नंदकुमार गव्हाणे, अमोल वाघमारे व जयसिंग कचरे यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.



सराईत गुन्हेगारासह जप्त करण्यात आलेला शस्त्रसाठा आणि माळेगाव पोलिसांचे पथक.

# स्मार्ट मीटर लादल्यास तीव्र आंदोलन करणार

## किसान काँग्रेसचा महावितरणला इशारा

**सातारा / प्रतिनिधी:–**

महावितरण कंपनीकडून सातारा जिल्ह्यातील वीज ग्राहकांना पाठविण्यात आलेल्या स्मार्ट मीटर संदर्भातील ४८ तासांच्या अल्टिमेटमविरोधात सातारा जिल्हा किसान काँग्रेसने तीव्र आक्रमक भूमिका घेतली आहे. ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसविण्याचा किंवा सक्ती करण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा किसान काँग्रेसचे कार्याध्यक्ष वसीम इनामदार व पदाधिकारी यांनी दिला आहे.

महावितरणने ग्राहकांच्या मोबाईलवर '४८ तासांत स्मार्ट मीटर बसविण्यात येईल, अन्यथा वीज जोडणी खंडित केली जाईल' अशा आशयाचे संदेश पाठवून दडपशाही सुरू केल्याचा आरोप किसान काँग्रेसने केला आहे. या प्रकाराला कायद्याचा आणि ग्राहक हक्कांचा भंग असल्याचे सांगत संघटनेच्या वतीने महावितरणचे मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांना निषेधाचे पत्र पाठविण्यात आले आहे. तसेच या पत्राच्या प्रती राज्याचे ऊर्जा मंत्री आणि सातारा जिल्हाधिकारी यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

किसान काँग्रेसने आपल्या निवेदनात भारतीय विद्युत कायदा २००३ तसेच महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या (टएफउ) नियमांचा उल्लेख करत, ग्राहकाचे विद्यमान मीटर सदोष असल्याचे अधिकृतरीत्या सिद्ध झाल्याशिवाय ते बदलण्याचा अधिकार महावितरणला नसल्याचा दावा केला आहे.

तसेच ग्राहकांची लेखी संमती न घेता दबाव टाकणे ही ग्राहक संरक्षण कायदा २०१९ अंतर्गत अयोग्य व्यापारी प्रथा असल्याचेही नमूद केले आहे. याशिवाय ग्राहकांच्या परवानगीशिवाय खासगी मालमत्तेत प्रवेश करून मीटर बदलण्याचा प्रयत्न झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर आणि अधिकाऱ्यांवर भारतीय न्याय संहितेनुसार अनाधिकृत प्रवेशाचा गुन्हा दाखल करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

''सातारा जिल्ह्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य ग्राहकांच्या घरातील सुस्थितीतील वीज मीटर त्यांच्या लेखी परवानगीशिवाय काढण्याची हिंमत कोणीही करू नये. अन्यथा महावितरणच्या कार्यालयांसमोर तसेच अधिकाऱ्यांच्या वाहनांसमोर तीव्र ठिय्या आंदोलन छेडण्यात येईल,'' असा इशारा वसीम इनामदार व काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दिला आहे. जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्यासह संबंधित विभागांना याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे.

दरम्यान, हे निवेदन देतेवेळी ॲड. नाझनीन फकीर, लक्ष्मण मोरे, कमलेश शिंदे, नाझीम इनामदार, संतोष डांगे यांच्यासह वीज ग्राहक उपस्थित होते.



सातारा : जिल्हाधिकारी संतोष पाटील यांना निवेदन देताना वसीम इनामदार, ॲड. नाझनीन फकीर, लक्ष्मण मोरे, कमलेश शिंदे व इतर.

# ५० फूट खोल विहिरीत आढळला अनोळखी इसमाचा मृतदेह

## सह्याद्री ट्रेकर्सच्या धाडसी बचावकार्याने मृतदेह बाहेर

**प्रतापगड/प्रतिनिधी:–**

कोरेगाव तालुक्यातील एका शेतातील सुमारे ५० फूट खोल विहिरीत अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. या घटनेची माहिती मिळताच कोरेगाव पोलीसांनी सह्याद्री ट्रेकर्स, महाबळेश्वर यांच्या मदतीची विनंती केली. त्यानुसार सह्याद्री ट्रेकर्सच्या सदस्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत धाडसी बचावकार्य करत मृतदेह विहिरीतून बाहेर काढून पोलिसांच्या ताब्यात दिला.

शनिवारी सकाळी सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास सह्याद्री ट्रेकर्स, महाबळेश्वर यांना कोरेगाव पोलीस स्टेशनमधून दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्यात आला. एका व्यक्तीचा मृतदेह विहिरीत आढळून आल्याची माहिती देत तातडीने मदतीची आवश्यकता असल्याचे पोलिसांनी सांगितले. महाबळेश्वरहून घटनास्थळी पोहोचण्यासाठी दीड ते दोन तासांचा कालावधी लागणार असल्याची माहिती देत सह्याद्री ट्रेकर्सने तत्काळ तयारी सुरू केली.

घटनेचे स्वरूप लक्षात घेऊन संजय पारठे, सर्जेराव खुटेकर आणि सुहास बेलकर हे तीन सदस्य त्वरित कोरेगावच्या दिशेने रवाना झाले. कोरेगावजवळील एका गावालगत शेत परिसरात असलेल्या विहिरीजवळ पोलीस पथक उपस्थित होते. घटनास्थळी पोहोचल्यानंतर टीमने विहिरीचे निरीक्षण केले असता सुमारे ५० फूट खोल विहिरीतील पाण्यात एका अनोळखी इसमाचा मृतदेह दिसून आला.



पोलिसांकडून प्राथमिक माहिती घेतल्यानंतर बचावकार्याला सुरुवात करण्यात आली. शेतकऱ्यांनी शेतासाठी पाणी सोडत असताना सकाळी विहिरीत मृतदेह दिसून आल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर सह्याद्री ट्रेकर्सच्या सदस्यांनी विहिरीच्या कडेला रोप सेटअप तयार केला. पोलिसांच्या परवानगीनंतर एका सदस्याने आवश्यक सुरक्षासाहित्याच्या सहाय्याने विहिरीत उतरून मृतदेहापर्यंत पोहोचत त्यास काळजीपूर्वक कापडी स्ट्रेचरमध्ये सुरक्षितपणे बांधले.

त्यानंतर दोरखंडाच्या साहाय्याने अत्यंत दक्षतेने मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आला. संपूर्ण प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर मृतदेह पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. मृत व्यक्तीची ओळख वृत्त लिहिपर्यंत पटलेली नव्हती. पुढील तपासासाठी मृतदेह रुग्णवाहिकेद्वारे शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला असून कोरेगाव पोलीस अधिक तपास करत आहेत.

या मोहिमेत सह्याद्री ट्रेकर्स, महाबळेश्वरच्या सदस्यांनी दाखविलेल्या तत्परतेचे आणि धाडसाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# शक्तीपीठ महामार्ग नसून शेतकऱ्यांसाठी शक्तीहीन रस्ता

## आ.जयंत पाटील :शक्तीपीठ विरोधात संघर्ष तीव्र करणार; कामेरीत शक्तीपीठ एल्गार सभा

**ईश्वरपूर / प्रतिनिधी :–**

नको असलेला शक्तीपीठ रद्द झालाच पाहिजे. हा महामार्ग शक्तीपीठ नसून शेतकऱ्यांसाठी शक्तीहीन रस्ता आहे. सरकारने हा शक्तीपीठ शेतकऱ्यांवर लादलेला आहे. शेतकऱ्यांच्या परवानगीशिवाय हा रस्ता होऊ देणार नाही असा इशारा आ. जयंत पाटील , आ. सतेज पाटील, माजी खा. राजू शेट्टी यांनी कामेरीतील शक्तीपीठ एल्गार सभेत दिला.

प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग रद्दसाठी कामेरी (ता. वाळवा) येथे रविवारी सर्वपक्षीय शक्तिपीठ विरोधात एल्गार शेतकरी सभा झाली. यावेळी आमदार सतेज ऊर्फ बंटी पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार जयंत पाटील, माजी खासदार राजू शेट्टी यांनी आक्रमक भूमिका मांडली.

आमदार सतेज ऊर्फ बंटी पाटील म्हणाले, आत्ताचे सरकार हे निष्ठूर आहे. ८६ हजार कोटींचा प्रकल्प एक लाख पाच हजार कोटींवर नेण्यात आला आहे. शक्तीपीठला एक लाख पाच हजार कोटी खर्च करण्यापेक्षा राज्यातील ५० किल्ले घ्या प्रत्येक किल्ल्याला पाचशे कोटी रुपये निधी द्या आणि ते व्यवस्थित करा. लाडक्या बहिणी योजनेतून १५ हजार पुरुष महिलांना या योजनेचा लाभ दिला. यावरूनच या सरकारचा किती चोख कारभार आहे हे लक्षात येते.

आमदार जयंत पाटील म्हणाले , शक्तीपीठ अधिसूचनेच्या विरोधात हरकती घेण्याची वेळ ३०जून पर्यंत आहे. शेतकऱ्यांनी पहिल्यांदा या अधिसूचनेला हरकती दाखल कराव्यात. सरकारने १८ हजार कोटी रुपये नळ पाणी योजनेचे थकवले आहेत . सरकारकडे देणी देण्यासाठी पैसे नाहीत. मात्र शक्तिपीठ करण्यासाठी पैसे आहेत. शक्तिपीठ महामार्ग रामटेकडे का जात नाही, पंढरपूरला शक्तीपीठ जात नाही. हा शक्तीपीठ रस्ता शेतकऱ्यांसाठी शक्तीहीन मार्ग आहे.

माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले, शक्तीपीठ साठी जमिनीचे पैसे दिल्यानंतर शेतकरीच आमची जमीन घ्या म्हणून मागे लागतील असे चंद्रकांतदादा म्हणालेत. परंतु चंद्रकांतदादांनी तुमची किंमत किती आहे ते सांगा आम्ही शेतकरी वर्गणी काढून तुमची किंमत भागवू. मुख्यमंत्र्यांचा हा ड्रीम प्रोजेक्ट गुंडाळून ठेवा. महाराष्ट्रातील शेतकरी हा महामार्ग चालू देणार नाहीत. विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांची जमीन हिरावून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. प्रचंड मोठ्या भरावामुळे वाळवा तालुका देशातील सर्वात मोठा पूरग्रस्त म्हणून देशात तालुका ओळखला जाईल. त्यामुळे उसाचे उत्पादन कमी होईल साखर कारखाने ऊस टंचाईमुळे अडचणीत येतील.

माजी मंत्री शिवाजीराव नाईक म्हणाले, हा रस्ता शेतकऱ्यांसाठी नव्हे, तर ठेकेदारांसाठी उभारला जात आहे,' असा आरोप केला तसेच शक्तिपीठ महामार्गाबाबत आमदार-खासदारांची भूमिका जनतेने स्पष्ट करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले तसेच विधानसभेत महायुतीचे बहुमत असले तरी रस्त्यावर आमचे बहुमत आहे, असा इशाराही त्यांनी सरकारला दिला.

माजी आ.मानसिंगराव नाईक म्हणाले, शक्तिपीठ साठी सुपीक जमीन जाणार आहे हे सरकार हिताचे नाही शेतकऱ्यांना देशद्रे लावणारे सरकार आहे या शक्तीपीठ विरोधात सामूहिकपणे सर्वांनी मिळून भूमिका मांडूया.




श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर, धनाजी गुरव, ईश्वरपूर चे नगराध्यक्ष आनंदराव मलगुंडे, कामेरीचे सरपंच रणजित पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष देवराज पाटील, शहाजीबापू पाटील, भाजपचे नेते सी.बी.पाटील, अभिनेते विलास रकटे, मनसेचे तानाजीराव सावंत, उद्धवसेनेचे जिल्हाध्यक्ष अभिजित पाटील, किरण लाड, संजय कदम, सुहास कदम, बोरगावचे सरपंच जितेंद्र पाटील, आनंदराव पाटील, दि.बा. पाटील, प्रा. अनिल पाटील, छाया पाटील, शहाजी पाटील, भागवत जाधव,यांच्यासह असंख्य शेतकरी आदी उपस्थित होते.